# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)


दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१५ गोंदिया | अंक १४ | बुधवार, दि.११ ते १७ मार्च २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# केंद्र सरकारकडून 'लिगसी अँड थ्रस्ट' जिल्ह्यात वर्गीकरण

**गडचिरोली :-** गेल्या चार दशकांपासून नक्षलवादाच्या दहशतीत वावरणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यावरील मसर्वात जास्त प्रभावित जिल्हाफ हा शिक्का आता पुसला गेला आहे. केंद्र सरकारने या जिल्ह्याचे वर्गीकरण आता 'लिगसी अँड थ्रस्ट' जिल्ह्यात केल्यामुळे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांमध्ये कंत्राटदारांना मिळणारी अतिरिक्त २० टक्के दराची सवलत आता रद्द होण्याची चिन्हे आहेत. या निर्णयामुळे सरकारी तिजोरीवर पडणारा अनावश्यक बोजा कमी होणार असून, विकासकामांच्या खर्चात पारदर्शकता येणार आहे.



महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या पत्रानुसार, केंद्रीय गृह मंत्रालयाने २६ डिसेंबर २०२५ रोजी गडचिरोली जिल्ह्याच्या श्रेणीत बदल केला. जिल्ह्यात नक्षलवादाचा प्रभाव लक्षणीयरीत्या कमी झाला असल्याचे केंद्राने नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर, ३१ डिसेंबर २००९ च्या जुन्या शासन निर्णयानुसार नक्षलग्रस्त भागातील कामांसाठी दिली जाणारी २० टक्के अतिरिक्त निधीची तरतूद आता अनावश्यक असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

गडचिरोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात शासनाला अहवाल सादर केला होता. त्यात जिल्ह्यातील सद्यस्थिती आणि सार्वजनिक हित लक्षात घेता, निविदा रकमेत अतिरिक्त २० टक्के शुल्क आकारणे आता योग्य वाटत नाही. या अतिरिक्त खर्चामुळे प्रकल्पांच्या किमतीत विनाकारण वाढ होत आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते.

### आदिवासी सवलत कायम राहणार

**नक्षलवादाची सवलत रद्द होणार असली तरी, गडचिरोली हा मआदिवासीबहुल जिल्हाफअसल्याने त्या संदर्भातील सवलतींना कोणताही धक्का लावण्यात आ-लेला नाही. आदिवासी जिल्ह्यांसाठी असलेली १० टक्के शुल्काची तरतूद तशीच कायम ठेवण्याची शिफारस करण्यात आली आहे. अवर सचिव अजित काटकर यांनी या प्रकरणाचा सविस्तर अहवाल आणि नियामक कार्यवाही तातडीने पूर्ण करून शासनास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे गडचिरोली जिल्ह्यात राबवल्या जाणाऱ्या कोट्यवधींच्या विकासकामांच्या निविदा प्रक्रियेत मोठे बदल होणार आहेत.**

# नक्षलवादाचा 'शेवटचा मोहरा' प्रशासनाच्या टप्प्यात

## पापारावच्या घरापर्यंत पोलीस अधीक्षक पोहोचले

**गडचिरोली :-** बस्तरच्या दंडकारण्यात गेली अनेक दशके दहशतीचे दुसरे नाव बनलेला आणि १ कोटींहून अधिक रकमेचे बक्षीस असलेला कुख्यात नक्षलवादी कमांडर सुन्नम पापाराव याच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलीस व प्रशासनाने मआरपारफ्ची लढाई सुरू केली आहे. प्रशासनाने आता पापारावच्या आत्मसर्पणासाठी भावनिक आवाहन आणि लष्करी दबाव असे दुहेरी चक्रव्यूह रचले आहे.

नुकतेच तेलंगणामध्ये छत्तीसगडमधील तब्बल १२५ नक्षलवाद्यांनी एकाच वेळी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नक्षली चळवळीला हादरा बसला. याच धर्तीवर आता पापारावनेही शस्त्रे खाली टाकावीत, यासाठी पोलीस आणि महसूल प्रशासनाने थेट त्याचे घर गाठले. सुकमा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी स्वतः आता पापारावच्या गावी जाऊन त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली. मपापारावला सांगा, हिंसाचाराचा मार्ग संपला, १२५ सहकाऱ्यांनी घेतलेला मार्ग स्वीकारा आणि शरणागती पत्करा,फ असे आवाहन त्याच्या नातेवाइकांमार्फत केले आहे. सुन्नम पापाराव ऊर्फ ममंगू दादाफ हा दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीचा अत्यंत प्रभावशाली सदस्य असून पश्चिम बस्तर विभागाचा प्रमुख आहे. एके ४७ सह वावरणाऱ्या पापारावला स्थानिक भौगोलिक रचनेची उत्तम माहिती व अभ्यास असल्याने तो अनेकदा सुरक्षा दलांच्या तावडीतून निसटला. काही काळापूर्वी झालेल्या चकमकीत त्याची पत्नी ऊर्मिला मारली गेली होती. शंभरहून अधिक गंभीर गुन्ह्यांची नोंद असलेला हा नक्षल नेता सध्या सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर आहे. विशेष म्हणजे देशभरात नक्षल संघटनेचे पॉलिट ब्युरो सदस्य मुप्पला लक्ष्मणराव ऊर्फ गणपती आणि मिशीर बेसरा असे केवळ दोन सर्वोच्च नेते शिल्लक आहे.



### आत्मसमर्पणाची शेवटची संधी

**केंद्र सरकारने ३१ मार्चपूर्वी देशातून नक्षलवाद हद्दपार करण्यासाठी सुरक्षा दलाची दोन वर्षापासून आक्रमक मोहीम सुरू आहे. त्यामुळे २०२६ च्या सुरुवातीलाध डीआरजी आणि विशेष पथकांनी पापारावला मजिवंत किंवा मृतफपकडण्याचे लक्ष्य ठेवले आहे. तेलंगणातील मोठ्या प्रमाणावरील आत्मसमर्पणानंतर नक्षली फळी खिळिखळी झाली असून, पापारावने शरणागती पत्करल्यास बस्तरमधील नक्षलवादाचा अध्याय कायमचा संपण्याची शक्यता आहे. प्रशासनाने आता चेंडू पापारावच्या कोर्टात टाकला असून, तो कुटुंबीयांच्या आवाहनाला प्रतिसाद देतो की जंगलातच आपला अंत ओढवून घेतो, याकडे आता सुरक्षा यंत्रणांचे लक्ष लागले आहे**

# राज्यात ११ नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय

*** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत घोषणा**

**मुंबई:** राज्यातील वाढती लोकसंख्या, दुर्गम भागातील भौगोलिक स्थिती आणि प्रशासकीय कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेता, राज्य सरकारने ११ नवीन मअप्पर जिल्हाधिकारीफ कार्यालये निर्माण करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या उभय सभागृहात यासंदर्भात निवेदन केले.

यामुळे जनतेला आता जिल्हास्तरावरील कामांसाठी लांबचा प्रवास करावा लागणार नसून, त्यांच्या नजीकच्या भागातच वरिष्ठ महसूल सेवा उपलब्ध होणार आहेत.

महसूल मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, खालील ११ जिल्ह्यांमध्ये नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालये प्रस्तावित करण्यात आली असून त्यांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.यामध्ये ठाणे,रत्नागिरी, पुणे (बारामती),सातारा,सोलापूर, जळगाव,नांदेड,अमरावती,यवतमाळ,बुलढाणा आणि नागपूर. याशिवाय, जमाबंदी आयुक्त कार्यालयातील कामकाजाचा भार कमी करण्यासाठी तिथेही दोन अतिरिक्त अप्पर जिल्हाधिकारी पदे देण्यात आली आहेत.

या नवीन कार्यालयांच्या कामकाजासाठी उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिल्याप्रमाणे एकूण १४३ पदांची निर्मिती केली जाणार आहे. प्रत्येक अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात १३ कर्मचारी/अधिकारी असतील. मंत्रिमंडळाने १० फेब्रुवारी २०२६ रोजीच्या बैठकीत एस-२५ या वरिष्ठ वेतन श्रेणीतील पदांना अंतिम मंजुरी दिली आहे.

*** साकोली आणि हिंगणघाटबाबत सकारात्मक चर्चा**

चर्चेदरम्यान नाना पटोले यांनी साकोली आणि हिंगणघाट येथेही अशा कार्यालयांची मागणी केली. त्यावर उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, "२०२७ च्या जनगणनेनंतर जिल्ह्यांच्या पुनर्रचनेचा विचार होऊ शकतो, मात्र सध्या अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून प्रशासन लोकांच्या दारी नेत आहोत. साकोली आणि हिंगणघाट संदर्भात लवकरच विशेष बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल."

*** शहरी भागातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रात तहसील कार्यालय विचाराधीन**

नागपूरचे उदाहरण देत लोकप्रतिनिधींनी शहरातील कामकाजाच्या व्यापावर लक्ष वेधले. त्यावर मंत्री बावनकुळे यांनी एक महत्त्वपूर्ण सूतोवाच केले. ते म्हणाले, "शहरी भागातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रात स्वतंत्र तहसील कार्यालय असावे, असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. यावर महसूल विभागाशी सखोल चर्चा करून लवकरच धोरणात्मक निर्णय घेतला जाईल."

**६९ अप्पर तहसील कार्यालये**

केवळ अप्पर जिल्हाधिकारीच नव्हे, तर राज्यात ६९ नवीन अप्पर तहसीलदार कार्यालये आणि १० नवीन प्रांत कार्यालये निर्माण करण्याचा प्रस्तावही अंतिम टप्प्यात असल्याची माहिती मंत्र्यांनी दिली. यामुळे राज्याच्या महसूल प्रशासनाचा चेहरामोहरा बदलणार असून सर्वसामान्यांची कामे अधिक गतीने होतील, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

# ओबीसींसाठी स्थापन मंत्रिमंडळ उपसमिती निष्क्रिय?




**नागपूर:-** इतर मागासवर्गीय समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठका होत नसल्याने तिच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उपसमितीची बैठक विण्यास वेळ नाही का, असा सवाल ओबीसी संघटनांकडून केला जात आहे.

इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना सुचवण्यासाठी सरकारने ३ सप्टेंबर २०२५ रोजी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन केली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन या समितीत सात मंत्री सदस्य आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव उपसमितीचे सचिव म्हणून काम पाहतात.

ओबीसी समाजासाठी राज्य शासनाकडून राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांचे परीक्षण करणे, त्यासंदर्भात उपाययोजना सुचवणे तसेच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे ही या समितीची प्रमुख जबाबदारी आहे. याशिवाय राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर ओबीसींना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी उपाययोजना करणे, ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीवर विचारविनिमय करणे, आरक्षणासंदर्भातील प्रशासकीय व वैधानिक कामकाजाचा समन्वय राखणे, न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू मांडणाऱ्या समुपदेशकांशी समन्वय साधणे या जबाबदाऱ्याही या उपसमितीकडे सोपवण्यात आल्या आहेत.

## विद्यापीठातील भौतिकशास्त्र संशोधकांनी विकसित केला फोल्डेबल मल्टीकलर एलईडी दिवा

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभाग प्रमुख व वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे आणि संशोधक सिद्धेश्वर एम. नागपुरे व आदित्य जगदाळे यांनी एक अभिनव आणि उपयुक्त असा फोल्डेबल मल्टीकलर एलईडी दिवा विकसित केला आहे. या संशोधनास युके डिझाईनचे नोंदणी प्रमाणपत्र त्यांना प्राप्त झाले आहे. हा दिवा आधुनिक जीवनशैलीसाठी उपयुक्त, ऊर्जा-कार्यक्षम आणि सहज वाहून नेता येणारा प्रकाश उपाय ठरत आहे.

फोल्डेबल एलईडी दिव्याची संकल्पना भौतिकशास्त्र विभागात डॉ. संजय ढोबळे, सिद्धेश्वर नागपुरे व आदित्य जगदळे या संशोधकांनी विकसित केली आहे. या प्रकल्पातून विद्यापीठीय संशोधन समाजपयोगी तंत्रज्ञान निर्माण करण्यात कसे महत्त्वाचे योगदान देऊ शकते, हे दिसून येते. हा फोल्डेबल एलईडी दिवा आकाराने लहान, वजनाने हलका आणि खिशात मावणारा असल्याने घरगुती वापर अभ्यासासाठी, कॅम्पिंग, प्रवास, कार्यशाळा तसेच आपातकालीन परिस्थितीत अत्यंत उपयुक्त ठरतो.

# विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेत शुल्क सवलत द्या-आ. बडोले यांची मागणी




**गोंदिया:-** महाराष्ट्र विधानसभेत ०९ मार्च रोजी स्पर्धा परीक्षा शुल्कासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली असून आमदार राजकुमार बडोले यांनी या मुद्द्यावर लक्षवेधी सूचना दरम्यान संबंधित विभागाचे मंत्री यांनी शुल्क सवलती संदर्भात समिती गठीत करण्याचे आश्वासन दिले.

आ. राजकुमार बडोले यांनी विधानसभेत बोलताना भारतीय संविधानाच्या कलम १४ आणि १६ चा उल्लेख केला, ज्यात सर्व नागरिकांना समान हक्क प्रदान करण्यात आले आहेत. मात्र, त्यांनी कलम ४६ चा विशेष उल्लेख करून आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या वर्गांना सवलती देण्याची तरतूद असल्याचे सांगितले. बडोले म्हणाले, मअनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, इतर

मागास वर्गीय आणि एसबीसी या सर्वांच्या हितसंबंधांचे रक्षण होणे गरजेचे आहे. राज्यात अजूनही या वर्गातील अनेक लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत आणि ते स्पर्धा परीक्षांचे शुल्क भरू शकत नाहीत. स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेऊ शकणार नाहीत आणि त्यांचा विकास खुंटेल. ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर मंत्र्यांनी समिती गठीत करण्याचे आश्वासन दिले.

### ५० टक्के सवलतीची मागणी

**स्पर्धा परीक्षा शुल्कात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, इतर मागास वर्गीय आणि एसबीसी यांना ५० टक्के सवलत देण्याची ठाम मागणी केली. 'सर्वांना सारखे शुल्क आकारले तर मागासवर्गीयांच्या हक्कांचा विचार होत नाही. केवळ १०० रुपयांचा फरक पुरेसा नाही. सरकारने परीक्षा फी परत करावी आणि योग्य सवलती प्रदान कराव्यात.' त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, मजर या मागण्या पूर्ण न केल्या तर संविधानाने मागासवर्गीयांना दिलेल्या सवलतींचे उल्लंघन होत नाही का? असा सवालही आ. बडोले यांनी उपस्थित केला. राज्यात अजूनही हजारो कुटुंबे आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. स्पर्धा परीक्षा ही त्यांच्यासाठी करिअरची संधी असते, पण शुल्कामुळे ते मागे राहतात. संविधानाच्या कलम ४६ नुसार, सरकारने त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.**


**रजिस्ट्रेशन ऑफ न्यूजपेपर (सेंट्रल) रुल्स १९५६ अंतर्गत साप्ताहिक वर्तमान पत्र बेरार टाईम्सच्या स्वामित्व तथा इतर विषयक माहिती**

**घोषणापत्र (फॉर्म ४)**

**१) प्रकाशन स्थान:-डोलारे एजन्सी समोरील रस्ता चंचलबेन स्कूल रोड गोंदिया**
**२)प्रकाशन कालावधी:-साप्ताहिक(दर बुधवार)**
**३)मुद्रकचे नाव:-अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, पत्ता:-लोकजन भवन तकिया वॉर्ड भंडारा**
**नागरिकत्व:-भारतीय**
**४)प्रकाशकाचे नाव:-खेमेंद्र हिरदीलाल कटरे**
**पत्ता:-डोलारे एजन्सी समोरील रस्ता, चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया**
**नागरिकत्व:-भारतीय**
**५)संपादकाचे नाव:-खेमेंद्र हिरदीलाल कटरे**
**पत्ता:- डोलारे एजन्सी समोरील रस्ता शिवनगर गोंदिया नागरिकत्व:-भारतीय**
**६)वर्तमान पत्राचे स्वामित्व:-खेमेंद्र हिरदीलाल कटरे**
**मी खेमेंद्र हिरदीलाल कटरे आपली पूर्ण माहिती जाहीर करतो की, वर दिलेली माहिती पूर्ण सत्य आहे.**
**दिनांक:-११ मार्च २०२६**
**स्थान:- गोंदिया**


# नवेगावबांध येथील पुस्तकाचे गाव दालन उदघाटनाच्या प्रतिक्षेतच






**गोंदिया :-** वाचन चळवळ समृद्ध करण्यासाठी राज्य सरकारने विदर्भातील नवेगावबांध हे मपुस्तकांचे गावफ म्हणून विकसित करण्याचे ४ वर्षांपूर्वी जाहीर केले. तेव्हापासून ही घोषणा सरकारी मकपाटाफ तच बंद आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर दोन वर्षे कुठलीच हालचाल झाली नाही. आता केवळ एकच दालन सुरू होण्याची शक्यता आहे.

केशवसुतांचे मालगुंड हे मपुस्तकांचे गावफ तर, कुसुमाग्रजांचे शिरवाड हे मकवितांचे गावफ करण्याचा निर्णय भाषामंत्री उदय सामंत यांनी जाहीर केला होते.नवेगावबांधला २५ मार्च २०२२ रोजी मपुस्तकांचे गावफ करण्यास मंजुरी देण्यात आली.तेव्हापासून या गावात कुठलीच हालचाल नाही.

सातारा जिल्ह्यातील भिलार हे राज्यातील पहिले पुस्तकांचे गाव ठरले, ही संकल्पना गावाने आणि रसिकांनी उचलून धरली. त्यानंतर या योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय झाला. पूर्व विदर्भातील गोंदिया नवेगावबांधसह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोभुले आणि सांगली जिल्ह्यातील अंकलखोप या चार गावांना या योजनेत सहभागी करून घेण्यात आले. नवेगावबांधसाठी गावकऱ्यांनीच पाठपुरावा नवेगाव फाउंडेशनने सरकारकडे पत्रव्यवहार केला. केला.

नवेगावबांध हे मपुस्तकांचे गाव पहावे यासाठी गापकऱ्यांनी पाठ?पुरावा केला. गोंदियासारख्या माओवाद?यस्त जिल्ह्यासाठी ही मोठीच याय ठरणार होती. मात्र लालफीतशाहीत सारे अडकले. दोन वर्षे गावात कुठल्याही प्रकारचे काम झाले नाही.रोष वाढू लागल्यानंतर ४ सप्टेंबर २०२४ ला निविदा मागविण्यात आल्या.त्यानंतर गेल्या आर्थिक वर्षात एक दालन सुरू होणार असल्याचा अंदाज बांधण्यात आला होता,मात्र तो सुध्दा फोल ठरला.

मात्र ४ वर्ष लोटूनही या दालनाचे लोकार्पण मात्र काही होईना. गोठणगाव मार्गावरील रामदास बोरकर यांच्या निवासस्थानी एक दालन पूर्णतः सुसज्ज आहे. सुमारे १,००० पुस्तके, पुस्तक कपाट, खुर्च्या तसेच रंगरंगोटी करून व्यवस्था तयार करण्यात आली आहे. गेल्या पंधरा महिन्यांपुर्वी राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक श्यामकांत देवरे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. मंत्रालयातील भाषा विभागाकडून ङ्गपुढील महिन्यात उद्घाटनफ अशी आश्वासने मिळाली; मात्र प्रत्यक्षात दालन आजही कुलूपबंदच आहे. नागपूर हिवाळी अधिवेशनाङ्ग दरम्यान उद्घाटन उरकविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती,ती सुध्दा फोल ठरली.

नवेगावबांध फाऊंडेशन या संस्थेद्वारे राज्यसरकारच्या मराठी भाषा विभागाकडे नवेगावबांध येथे ही योजना गावात राबवण्यात यावे याकरीता पाठपुरावा करण्यात आलेला होता.त्यानंतरच नवेगावबांधचा पुस्तकाचे गाव योजनेत समावेश झाला.या ठिकाणी पर्यटनाला येणाऱ्या पर्यटकांना विविध २००० पुस्तके वाचनाची मेजवानी कधी मिळणार हा प्रश्न निर्माण झाला आहे.पुस्तकांचे गाव हे दालन सज्ज करण्यात आले. पण, या दालनाच्या उद्घाटनासाठी मंत्री आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना वेळ मिळत नसल्याचे चित्र आहे. परिणामी हे दालन अद्यापही कुलूपबंद आहे. विधानसभेत मराठीच्या संवर्धनावर चर्चा होते, पण प्रत्यक्षात योजना उद्घाटनाविना धूळ खात असेल तर याला काय म्हणावे असा प्रश्न आहे. मराठी भाषा संवर्धन हे धोरण आहे की केवळ वार्षिक कार्यक्रम, कारण नवेगावबांधचे बंद दालन अनेक प्रश्न विचारीत आहे.

वाचन चळवळ वाढावी, मराठी भाषेतील नवे जुने लेखक, संत साहित्य, कादंबरी, ललित, चरित्र आत्मचरित्र, स्त्री साहित्य, क्रीडा, बालसाहित्य यांच्या फुललेल्या आणि बहारलेल्या विश्वात वाचनाचा आनंद घेता यावा यासाठी राज्य सरकार हा प्रकल्प राबवते. मपुस्तकाचे गावफ या योजनेची व्यापकता वाढवण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात एक मपुस्तकाचे गावफयोजना सुरु करून योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयानुसार राज्यातील मपुस्तकाचे गावेफ विस्तारीत स्वरुपात सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला जिल्ह्यातील नवेगावबांधचा समावेश करण्यात आला खरा मात्र आजही या ठिकाणी कुठल्याही प्रकारच्या सोयीसुविधा पाहिजे तशा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत.

### प्रशासनाच्या दुर्लक्षाने दालन उदघाटनाच्या प्रतिक्षेत

**पुस्तकाचे गाव म्हणून नवेगावबांधची निवड झाल्यानंतर दोन वर्ष कुठलेच काम झाले नाही,मात्र १० दालनापैकी आपण स्वतःआपल्या मालकीचे एक दालन पुस्तकांचे दालन सुरु करण्याकरीता उपलब्ध करुन दिले आहे.माजी मंत्री व आमदार राजकुमार बडोले यांनीही या दालनाची पाहणी केली तर मराठी भाषा विभागाचे संचालक सुध्दा नवेगावबांधला येऊन गेले,मात्र दालन सुरु होऊ न शकल्याची खंत नवेगावबांध फाऊंडेशनचे अध्यक्ष रामदास बोरकर यांनी व्यक्त केली.**

# आरटीई प्रवेश;अखेर एक किमीची अट रद्द

## न्यायालयाचा राज्य शासनाला दणका !

**गोंदिया :-** आरटीई कायद्याअंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये वंचित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यासाठी २५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. याच कायद्याबाबत आता मोठी अपडेट समोर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारच्या आरटीई प्रवेशाच्या एक किमीचा अंतराचा निर्णय न्यायालयाने स्थगित केला आहे. परिणामी या निर्णयाचा प्रत्येक्ष लाभ गरजूलाभार्थ्यांना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सविस्तर असे की, याआधी सरकारच्या नव्या नियमानुसार आरटीई अंतर्गत शाळेत प्रवेश मिळवायचा असेल तर विद्यार्थाच्या निवासस्थानापासून १ किलोमीटर परिसरात असलेली शाळाच निवडता येत होती. आरटीई कायद्याअंतर्गत शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक दुर्बल गटातील मुलांना कोणत्याही खासगी शाळेत प्रवेश दिला जातो. याच कायद्यामधील राज्य सरकारने एक नवा नियम आणला होता. त्याबाबत न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे.

आरटीई प्रवेशासाठी लागू करण्यात आलेल्या राज्य सरकारच्या एक किमीच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. सरकारच्या नव्या नियमानुसार आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी विद्यार्थाच्या निवासस्थानापासून १ किलोमीटर परिसरातील शाळाच निवडता येत होती. सरकारच्या या निर्णयाला ॲड. बोधी रामटेके आणि ॲड दीपक चटप यांनी आव्हान देत नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. याच याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. शिक्षण हक्क कायदा हा केंद्र सरकारचा आहे. त्यात राज्य सरकार सुधारणा करून एक किलोमीटरची अट लादणे म्हणजे एका हाताने अधिकार देऊन दुसऱ्या हाताने काढून घेण्यासारखं आहे, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. परिणामी आरटीई प्रवेशाची एक किमी. ची अट रद्द केल्याने याचा प्रत्यक्ष लाभ गरजू लाभार्थ्यांना मिळणार.




### मुलांना निवडता येणार कोणतीही शाळा

**शिक्षण हक्क कायदा हा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतो. एक किमीची अट मनमानी, अवैध आणि संविधानविरोधी असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता पालकांना आपल्या मुलांसाठी कोणतीही शाळा निवडता येणार आहे. न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.**

## संपादकीय

# संघ भाजप का फुटत नाही आणि बहुजनच का फुटतात?

डॉ. मस्के यांनी परवा जो राष्ट्र भूमिकेवर कार्यक्रम घेतला त्यात भारत राष्ट्र आणि हिंदुराष्ट्र यावर यांनी विस्तृत भूमिका मांडली. खरं म्हणजे हिंदुराष्ट्रासाठी रा स्व संघ शंभर सालापासून राबत आहे. आणि त्याला किती किती यश मिळाले किंवा मिळाले आहे हे आपण पाहतो आहोत. ते तर म्हणतात हे हिंदुराष्ट्रच आहे. परंतु या देशातील बहुसंख्य जाणती जनता त्या विरोधात आहे. विशेषता फुले पेरियार आंबेडकर यांची भूमिका ही हिंदू राष्ट्र पूर्णपणे नाकारणारी आहे. म्हणजे सर्व समतावादी, जात व्यवस्था विरोधी लोक हिंदुराष्ट्र भूमिकेच्या विरोधी आहेत.

दुसरं म्हणजे हिंदुराष्ट्रवादी वा चातुर्वर्ण्यवादी संघ परिवार यांच्या जी एकता आहे, त्यासाठी ते कटिबद्ध आहेत त्यांच्यात विभागणी, विभाजन, मतभिन्नता नाही पण जे समतावादी आहेत, ते मात्र अगणित गटातटात, संघटनात, पक्षात विभाजित आहेत.

परवा प्रविण कांबळे यांनीही सौरभ मधील लेखात ही खंत व्यक्त केली. आमच्यात फूट तूट कां होते आणि संघ परिवार का एकजूट आहे अशी सार्थक मांडणी केली आहे.

याला कारण काय! आम्ही सर्व फुले शाहु आंबेडकर अशी आदर्श म्हणून नावे घेतो परंतु असंख्य गटात, परस्पर हेव्यादाव्यात, अहंकारात आहोत. ज्या महानांची नावे घेतो त्यांच्या विचारधारा राबवण्यासाठी संघटना किंवा पक्ष काढला असे सांगतो. या महानांचे विचार अनेक संघटना काढा असे आहेत का?

संघात आणि आमच्यात काय फरक आहे तो समजून घ्यायला पाहिजे. संघ किंवा भाजप फुटत नाही, त्यांचे विभाजन होत नाही यामागे त्याची भूमिका आहे हेही फाटाफूटीत असणाऱ्या बहुजनांनी समजून घ्यायला हवे.

संघ जाती व्यवस्थेचा पुरस्कर्ता आहे. ती संघाची आयडीओलॉजी आहे आणि ही त्यांच्या जुन्या ग्रंथांवर, अगदी वेदापासून मनुस्मृती पर्यंतच्या ग्रंथावर आधारित आहे. आणि ही वर्णजात व्यवस्था हा त्याचा सर्वात मोठा आधार आहे, साधन आहे आणि त्या माध्यमातून जी मानसिक उतरंड इथल्या बहुसंख्य लोकांवर हावी झालेली आहे तिचा फायदा फक्त संघ किंवा ब्राह्मण घेतात. संघ नुसता एकजूटच नाही तर त्याच्या अनेक संघटनांच्या माध्यमातून तो हिंसक आहे, क्रूर आहे आणि म्हणून एक प्रकारची दहशत सुद्धा संघाने निर्माण केली आहे. बाकी सर्व धर्म हे चूक आहेत किंवा संप्रदाय आहेत किंवा शत्रू आहेत अशा प्रकारची मानसिकता त्याने निर्माण केलेली आहे.

संघ सतत आक्रमक भूमिकेत असतो. ही आक्रमकता किंवा हिंसा ही फक्त इतर धर्माच्या बाबतीतच नाही तर ज्यांना संघ हिंदू म्हणतो, इथे बहुसंख्य लोक हिंदू आहेत अशी भूमिका सांगतो ती भूमिका राबवत असताना हिंदूंच्याच विरुद्ध आक्रमक आणि हिंसक भूमिका घेतो. उदाहरणार्थ या देशात ज्यांना दलित म्हटले आहे, अस्पृश्य म्हटले आहे त्यांच्या विरोधात एक प्रकारची हिंसक वृत्ती दिसून येते. त्यांच्यावर अत्याचार करणे, बहिष्कार टाकणे, विवाह प्रसंगी ते घोड्यावर बसले तर हिंसक होणे वा ते तसेच राहावे म्हणून दबाव आणणे सुरू आहे. म्हणजे हिंदू म्हणायचे पण अत्याचार जारी ठेवायचे. आदिवासीं बाबत थोड्याफार प्रमाणात हीच भूमिका आहे.

देशात ज्यांची बहुसंख्या आहे, जो ओबीसी वर्ग आहे हा वर्ग देखील जेव्हा आपल्या हक्कांची मागणी करतो, समतेची मागणी करतो किंवा आरक्षणाची मागणी करतो तेव्हा त्याच्या विरोधात संघ परिवार, विशेषता संघातले स्वतःला उच्च म्हणणारे लोक हिंसक होतात. आक्रमक होतात. मंडल आयोगाच्या वेळेस जी भूमिका संघाने किंवा ब्राह्मणी संघटनांनी घेतलेली होती ती त्यांच्या विरोधात होती. त्या वेळी अनेक आत्महत्या घडवून आणल्या होत्या. त्याचप्रमाणे या बहुसंख्य ओबीसींना वापरण्यासाठी मग राम मंदिराचा मुद्दा पुढे आणण्यात आला आणि त्या माध्यमातून मुस्लिम विरोधी हिंसा घडविण्यात आली.? गुजरात मधले गोधरा प्रकरण किंवा बाबरी मस्जित पडल्यावर जी हिंसा झाली त्या माध्यमातून ओबीसींना किंवा त्यांच्या प्रश्नांना बाजूला तर ठेवलेच, परंतु त्याचा अजून एक फायदा घेतला तो म्हणजे मंदिर मुद्दा पुढे करून ओबीसींना मुस्लिम विरोधी करण्याचे षडयंत्र पार पाडले.

### आमच्या संघटना

आम्ही जेव्हा आमच्या संघटनांचा, पक्षांचा विचार करतो तेव्हा हे दिसून येते की आम्ही संघ विचारांना सबमिट आहोत, शरण आहोत कारण आम्ही सुद्धा जात पाळतो, उच्च नीचता मान्य करतो. तेव्हा ती संघाची भूमिका असते कारण संघ हा जातीव्यवस्थेच्या उतरंडीवर उभा आहे. जे ओबीसी वा दलित जात पाळतात ते ब्राह्मण वर्चस्व मान्य करतात. ब्राह्मण वर्चस्व मान्य करणे हा संघाच्या भूमिकेचा विजय आहे.

दुसरं म्हणजे संघाची भूमिका जी गोळवलकरांनी मांडली. ते जाहीरपणे असं सांगतात की आम्ही या देशातील सगळ्या लोकात श्रेष्ठ आहोत आणि आम्ही म्हणतो तसं लोकांनी वागलं पाहिजे. मनुस्मृतीमध्ये म्हटले हे की ब्राह्मण सर्वांचे निर्माते आहेत, मालक आहेत. तीच भूमिका आज संघ घेत आहे. संघ म्हणतो ती आम्ही या देशाचे मालक आहोत.

गोळवलकरांनी बंच ऑफ थॉट्स या पुस्तकात ही मांडणी केलेली आहे. म्हणजे संघ या देशाचा मालक समजतो. संघ समजतो म्हणजे ब्राह्मण समजतात.

### मनुस्मृतीची भूमिका

ही मनुस्मृतीची भूमिका आहे आणि ती शेकडो वर्षांपूर्वीची आहे आणि आजही संघ ही भूमिका साकारत आहे. यावरून हे दिसते की आमच्या संघटनांमध्ये किंवा संघाच्या संघटनांमध्ये ध्येयाच्या बाबतीमध्ये जो फरक आहे तो लक्षात घेतला पाहिजे. आम्ही आजही मागण्याच्या भूमिकेत आहोत. आम्हाला आरक्षण द्या, आम्हाला न्याय द्या असं जेव्हा इथले दलित ओबीसी किंवा मुसलमान म्हणतात तेव्हा ती ब्राह्मण समोर, हिंदूराष्ट्रा समोर करण्यात येणारी याचना आहे. तुम्ही हक्क म्हटलं तरी ते देत नाही. संविधानाला सुद्धा ते मानत नाही. संविधानामध्ये दिले आहे ते सुद्धा इथल्या बहुसंख्य लोकांना कसं मिळणार नाही याची तजवीच ते करत आहेत. आजवर केलेली आहे आणि म्हणून हे समजून घ्यायला पाहिजे की त्यांचं जे ध्येय आहे, त्यांची जी भूमिका आहे ती समजून घ्यायला पाहिजे.

आजची जी स्थिती समाजात आहे तीच स्थिती कायम ठेवणं आणि पुढे मनुस्मृती प्रमाणे ब्राह्मण सर्वांचे मालक हीच भूमिका ते ठेवणार आहेत. या भूमिकेच्या विरोधामध्ये बहुजन समाजातील दलित, आदिवासी, ओबीसी मधील कोण भूमिका घेत आहेत?

वर्ण-जातिव्यवस्था त्यांचे हिंदू राष्ट्र आहे. त्या विरोधामध्ये समतेवर आधारित राष्ट्र निर्माण करण्याची भूमिका आम्ही घेतो का की आम्ही आपसामध्येच भांडतो? आमचा मर्यादित, छोटासा अहंकार आम्हाला अलग ठेवतो. ब्राह्मणांमध्ये अहंकार आहे सामाजिक वर्चस्वाचा!

आणि तो प्रत्येक ब्राह्मण मनात ठेवतो म्हणून त्यांच्यामध्ये कुरबुरी असल्या तरी सामाजिक वर्चस्वाचा अहंकार प्रत्येक ब्राह्मण मनात ठेवतो. म्हणून त्यांच्यामध्ये कुरबुरी असल्या तरी ते आपलं वर्चस्व कायम ठेवण्यासाठी सतत एकत्र असतात. आम्ही मात्र खाली राहण्यासाठी भांडत असतो. एकमेकांच्या संघटना व पक्षाचा विरोध करतो. आम्हाला सर्व जाती या समान आहेत, कुठलीही जात उच्च वा नीच नाही अशा भूमिकेमध्ये आमची भूमिका जात नाही. अशी

भूमिका आम्ही जपतो, म्हणजे त्यांच्या वर्चस्वाला मदत करतो. त्यांना शिव्या देऊन, टीका करून त्यांचं वर्चस्व कमी होणार नाही. ते कमी करण्यासाठी किंवा समता स्थापन करण्यासाठी तुम्हाला एकत्र यावं लागेल. एकजूट व्हावे लागेल. एक ध्येय ठेवावे लागेल. या देशांमध्ये सामाजिक समता निर्माण करणे हेच हिंदू राष्ट्राला उत्तर आहे. हेच बहुजन राष्ट्र आहे बुद्ध राष्ट्र आहे सिंधू राष्ट्र आहे हे मान्य करावे लागेल. त्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करावे लागतील.

**नागेश चौधरी**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# कर्जमाफीच्या घोषणेत बोनसचा बळी!



### घोषणेकडे शेतकऱ्यांचे लक्ष

**मागील काही वर्षांचा अनुभव पाहता, शासन हेक्टरी ठरावीक रक्कम सानुग्रह अनुदान किंवा बोनस म्हणून जाहीर करते. गेल्या वर्षीही शासनाने बोनस दिला होता: त्यामुळे यंदाच्या अधिवेशनात मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री धान उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरात काय टाकतात, यावर जिल्ह्याचे अर्थकारण अवलंबून आहे. शासनाने कर्जमाफीची घोषणा केली. त्यामुळे धान उत्पादकांसाठी बोनसची घोषणा करणार की नाही, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष्य लागले आहे.**

**गोंदिया :-** जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रत्येक वर्षी राज्य शासनाकडून खरीप हंगामातील पिकांना हमीभाव व्यतीरिक्त बोनस जाहीर करीत असते, मात्र यंदाच्या मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पात राज्य शासनाने २ लाखापर्यंतची कर्जमाफी जाहीर केली. शिवाय जे नियमित कर्जदारांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान जाहीर केले. मात्र प्रत्येक वर्षी जाहीर करण्यात येणारा बोनस अद्यापही प्रतिक्षेत आहे, त्यातच कर्जमाफीच्या घोषणेत बोनसचा बळी तर गेला नाही, अशी शंका शेतकरी व्यक्त करू लागले आहेत.

यंदाच्या खरीप हंगामात जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने जिल्ह्यात ठिकठिकाणी धान खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली होती. शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आणि केंद्रांवर धानाची विक्रीही केली. धानखरेदीचे उद्दिष्ट न वाढविल्याने अनेक शेतकऱ्यांकडे धान पडून आहे. याशिवाय उशिरा पीक पेरा नोंदविणारे शेतकरी नोंदणीपासून वंचित आहेत. धानाला मिळणारा आधारभूत भाव लागवडखर्चाच्या तुलनेत कमी असल्याने, बोनस स्वरूपात मिळणारी अतिरिक्त मदत शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. या वर्षी शेतकऱ्यांना धान विक्रीचे पैसे दीड ते दोन महिने उशिरा खात्यात जमा झाले होते. मागील वर्षी तर बोनसची रक्कम रखडली होती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडले होते. या वर्षी तरी शासनाने लवकर हेक्टरी धान बोनस देण्याची घोषणा करावी, अशी भावना सामान्य शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी या अधिवेशनात बोनसचा प्रश्न किती आक्रमकपणे मांडतात आणि सरकार यावर कधी मोहोर उमटवते, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

# पवार महिला समितीतर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

**गोंदिया :** पवार प्रगतिशील मंच व श्री प्रगतिशील शिक्षण संस्था, गोंदिया यांच्या मार्गदर्शनाखाली पवार महिला समितीच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कन्हारटोली येथील पवार सांस्कृतिक भवनात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देत विविध सांस्कृतिक व प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नगरसेविका सौ.मैथुला बिसेन होत्या. तर कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय पवार महासभेच्या महिला अध्यक्षा श्रीमती केसरबाई बिसेन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय उपाध्यक्ष सौ.मंजूषा हरिणखेडे, राष्ट्रीय सचिव सौ.दिव्या तुरकर, राष्ट्रीय सहसचिव सौ.विमल कटरे, राष्ट्रीय सहकोषाध्यक्ष सौ.मेघा बिसेन, सौ.रश्मी रहांगडाले, डॉ.प्रतिभा पारधी, डॉ.स्विटी बघेले, डॉ.पायल बघेले, डॉ.गीतिका पारधी, डॉ.चायना बिसेन, डॉ.दिशा कटरे, डॉ.पायल चौधरी, डॉ.वर्षा रहांगडाले, डॉ.पायल कटरे, डॉ.पूजा बोपचे, डॉ.साक्षी बिसेन, डॉ.हर्षा रहांगडाले, पवार प्रगतिशील मंचाच्या सौ.उर्मिला रहांगडाले, सौ.उपमा गौतम, सौ.धनिशा कटरे, सौ.छाया पटले, सौ.चेतना चौहान, सौ.हिना चौधरी व सौ.सोनाली रहांगडाले आदि प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या प्रगतीसाठी शिक्षण, आरोग्य व सामाजिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

# १,९३८ मामा तलाव अतिक्रमणाच्या विळख्यात



**नागपूर :-** पूर्व विदर्भातील १,९३८ माजी मालगुजारी (मामा) तलाव अतिक्रमणाच्या विळख्यात असल्याची माहिती जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली.

मामा तलावांच्या अतिक्रमणाचा मुद्दा तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून विधानसभेत उपस्थित करण्यात आला. गोंदिया जिल्ह्यात असलेल्या १४२१ तलावात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने तलावांची पाणी साठवण क्षमता घटली. परिणामी शेतीला पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. मामा तलावांचे पुनर्जीवन आणि सिंचन व्यवस्था शाश्वत करण्यासाठी करण्याची मागणी सभागृहात झाली. यावर जलसंधारण मंत्री राठोड यांनी सांगितले की, गोंदिया जिल्ह्यातील माजी मालगुजारी तलावामधील अतिक्रमण काढण्याकरिता तलावांची मोजणी व सीमांकन करण्यासाठी १०.४५ कोटीचा प्रस्ताव गोंदिया जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तयार केला आहे. तो नागपूरचे प्रादेशिक जलसंधारण नियंत्रक अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत वित्त विभागाकडे जाईल.

मामा तलावांची विशेष दुरुस्ती व पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत १९७६ दुरुस्तीची कामे पूर्ण झाली आहेत. वर्ष २०२३-२४ मधील सुधारित कार्यक्रमानुसार दुसऱ्या टप्प्यामध्ये १०७७ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. त्यापैकी १०५५ कामांना कार्यदिश आदेश देण्यात आलेत. तर ११० कामे पूर्ण झालीत. २०२५-२६ या आर्थिक वर्षात १०० कोटी निधीची तरतूद अर्थसंकल्पात असल्याचे राठोड यांनी सांगितले.

# दर्जेदार रस्ते निमि 'तीने विकासात पडते भर -जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर



**अर्जुनी मोरगाव :** -गावांना जोडले जाणारे रस्ते दर्जेदार बनावे. सुसज्ज मार्गामुळे गावातील सौंदर्य फुलून उठते. ग्रामीण भागातील मूलभूत सोयी सुविधा पूर्ण झाल्या तरच गावाचा सर्वांगीण विकास साधने सहज शक्य आहे. गावातील प्रत्येक माणूस हा विकासाचा मुख्य कणा आहे. ग्रामीण भागाचा विकास साधण्यावर आपला सर्वाधिक भर आहे. गुडगुडीत, दर्जेदार रस्ता निर्मितीने गावाच्या वैभवात भर पडणार असे प्रतिपादन जि. प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

तालुक्यातील बोंडगावदेवी येथे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी ग्रामपंचायत पदाधिकारी प्रतिमा बोरकर, डॉ. श्यामकांत नेवारे, राधेश्याम झोडे, ॲड. श्रीकांत बनपूरकर, रत्नाकर बोरकर, धनंजय बनपूरकर, देवराव बोरकर, नानू मेश्राम, ग्राम विकास अधिकारी संतोष परमार, उमेश उईके, यशवंत बोरकर, भागवत लंगे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत गावात विविध विकास कामांचा शुभारंभकरण्यात आला.यावेळी वॉर्डातील महिलांनी पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या असल्याची बाब जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या लक्षात आणून दिली. याची दखल घेत त्यांनी लवकरच नवीन बोअरवेल मंजूर करण्याचे आश्वासन दिले. गावात भेडसावणाऱ्या समस्या प्राधान्याने दूर करणार. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्राम स्थांनी एकजुटीने पुढे आल्यास विकासाची गंगा गावात येण्यास विलंब लागणार नाही असे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

# पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेते महामंडळे पुढील अधिवेशनाच्या आत स्थापन करणार

### मंत्री आशिष शेलार यांची ग्वाही; पत्रकारांच्या समस्यांवर व्यापक बैठक घेणार

**मुंबई :-** पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची कार्यवाही पुढील अधिवेशनाच्या आत करण्यात येईल, तसेच पत्रकारांच्या विविध विषयांवर पत्रकार संघटना, शासनातील विविध विभाग, संबंधित लोकप्रतिनिधी यांची एक व्यापक बैठक लवकरच घेण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री अशी शेलार यांनी सोमवारी (९ मार्च) विधान परिषदेत दिली.



आमदार श्रीकांत भारतीय यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित करून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले. या लक्षवेधीमध्ये त्यांनी पत्रकार आणि वृत्तपत्र विद्यार्थ्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, कोरोनानंतर वृत्तपत्र क्षेत्रात निर्माण झालेल्या अडचणी, त्यातून निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने असलेल्या त्यांचे योजनेचे प्रस्ताव रखडणे, वर्तमानपत्र खरेदी करणारे वाचकांना आयकरात सूट देणे, पत्रकारांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी महामंडळातर्फे मदतीची आवश्यकता, गृहनिर्माण योजनेअंतर्गत पत्रकारांना घरे देणे, जाहिरातीवरील जीएसटी रद्द करणे, अशा विविध विषयांकडे लक्ष वेधले होते.

मुख्यमंत्र्यांच्यावतीने उत्तर देताना मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले की, दोन्ही महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय मंत्री मंडळाने १० आक्टोबर २०२४ ला घेतला असून विविध खात्यांशी या विषयांचा समन्वय करायचा असल्याने ती प्रक्रिया सुरु असून पुढील अधिवेशनाच्या आत याबाबत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुन ही महामंडळे स्थापन करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. तसेच वर्तमानपत्रांचे आपल्या. लोकशाही प्रक्रियेत महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळेच चौथा स्तंभ म्हणून आपण स्थान दिले आहे. कोरोना काळात या क्षेत्रासमोर अनेक अडचणी निर्माण झाली तशीच काही नवीन आव्हाने सुध्दा उभी राहिली. त्यामुळे यातून मार्ग काढून या क्षेत्रातील अडचणी सोडवण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करते आहे तेही त्यांनी आपल्या उत्तरात विषद केले.

दरम्यान, या चर्चेत आमदार सतेज पाटील आणि अन्य सदस्यांनी ही भाग घेऊन बाळशास्त्री जांभेकर पेन्शन योजनेतील विलंब व काही अटी शर्तीबाबत प्रश्न उपस्थित केले. तर पत्रकार सुरक्षा कायदा या विषयाकडे लक्ष वेधले. दरम्यान, हे विषय विविध खात्यांशी संबंधित असल्याने याबाबत एक सर्व विभागांची संयुक्त बैठक येत्या अधिवेशनाच्या आत घेण्यात येईल. त्यामध्ये या सगळ्या प्रश्नांवर चर्चा करू, असे मंत्री शेलार यांनी आश्वस्त केले.

# नवेगाव-नागझिरा पर्यटनस्थळाला प्रदूषणाचा विळखा

**गोंदिया:-** जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या नवेगाव-नागझिराच्या बांध परिसरात वाढत चाललेले प्रदूषण, अस्वच्छता आणि व्यवस्थापनातील गोंधळ यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. नैसर्गिक सौंदर्य, विशाल तलाव आणि स्थलांतरित पक्ष्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या नवेगाव-नागझिरा वन्यजीव अभयारण्य परिसरात दरवर्षी देश विदेशातून हजारो पर्यटक भेट देतात. मात्र, अलिकडच्या काळात नवेगावबांध तलाव परिसरात वाढलेल्या प्लॅस्टिक कचऱ्यामुळे आणि दुर्लक्षित स्वच्छतेमुळे या पर्यटनस्थळाच्या प्रतिमेला धक्का बसत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे. एकंदरीत नवेगाव नागझिरा पर्यटनस्थळाला प्रदुषणाचा विळखा बसला असल्याचे चित्र दिसू लागले आहे.

परिसरात फेरफटका मारताना अनेक ठिकाणी प्लॅस्टिकच्या बाटल्या, पॅकेट्स आणि इतर कचरा विखुरलेला दिसून येतो. काही स्टॉलधारकांकडून साफ सफाई केली जात असली, तरी कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन होत नसल्याचे सांगितले जाते. यासंदर्भात विचारणा केली असता, येथील उपसंचालक प्रीतम कोडापे यांनी चौकशी करतो, अशी प्रतिक्रिया दिली.

# दहा दहा अपत्य आणि नरकयातना!

काही उपटसुंभाना अधूनमधून जास्त मुलं जन्माला घालण्याचा कंड आला की, इतकी मूलं तितकी मूलं जन्माला घाला म्हणून लोकांचे माथे भडकवण्याची कारस्थाने चालू असतात. एक मूल जन्माला घालताना त्या माऊलीला किती प्रसववेदना होत असतात, हे या उपटसुंभाना काय माहीत? अशा संवेदना समजून घेण्यासाठी किमान माणसाचे डॉक्टर तरी हवेत ना! यांचे प्रचारक सडेफटिंग राहून, कौटुंबिक जबाबदारीला दांडी मारुन कारस्थानी गँगमध्ये इमानीपणे काम करतात. त्यांचे जातवर्णपुरुषसत्ताकवर्चस्व सर्वस्वी शाबूत ठेवण्यासाठी खूणगाठ बांधून लोकांची मती गुंग करणे, भ्रमित करणे यासाठी आजन्म बायकापोरांशिवाय राहतात. आणि लोकांना जनावरासारखी लेकरं जन्माला घालायला सांगतात. ज्यांना संसार नाही, कुटुंब नाही, लेकरं नाही, कौटुंबिक विवंचना नाही, लेकराबाळाचं संगोपन, जडणघडण याच्या जबाबदारीशी सोयरसुतक नाही असे वावदूक उचलली जीभ लावली टाळ्याला असे बरळतात. नव्हे ते हेतुपुरस्सर सामान्य लोकांना अधोगतीला लावण्याच्या इराद्याने तसं करत असतात, किंबहुना तो त्यांच्या जीवितकार्याचा अविभाज्य भागच राहिलेला आहे.

"तीन तीन लेकरं, चार चार लेकरं, दहा दहा लेकरं जन्माला घाला."

हे सांगत असतांना आपल्याच धर्म बांधवांवर गरीबी, दारिद्र्य, अनारोग्य आणि निकृष्ठ जीवनमान अशी परिस्थिती ओढवली जाईल अशाप्रकारे चुकीचे सल्ले दिले जात असताना जराही लज्जा वाटू नये का? म्हणजे दहा दहा अपत्य जन्मा घाला आणि नरकयातना भोगा...

या देशात लोकसंख्येचा भस्मासूर समस्त भारतीयांच्या मानगुटीवर बसला आणि एकूणच विकासाच्या मार्गात प्रचंड वेगाने वाढलेली लोकसंख्या मोठा अडसर वाटत असताना, लोकसंख्या वाढीस पायबंद घालणे हा देशासमोर फार मोठा गंभीर आणि चिंतेचा विषय होता. पण वैद्यकीय शास्त्रात नसबंदी आणि गर्भनिरोधक तंत्र व साधनं उपलब्ध होऊ लागली असली तरीदेखील त्याबद्दलची जाणीवजागृती आणि वापर करण्यासाठी मार्गदर्शक यंत्रणा यांची कशी फटफजीती झालेली आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी तत्कालीन सरकारी यंत्रणा, प्रशासन आणि खुद्द देशाचे नेतृत्व बदनाम झाले. कुटुंब नियोजनासाठी लोकांना राजी करण्यात व प्रसंगी अगदी ताठर भूमिका घेतल्यामुळे तत्कालीन प्रधानमंत्र्यांना जनक्षोभाचा सामना करावा लागला.

'हम दो, हमारे दो', छोटा परिवार, सुखी परिवार, अशा लोकप्रिय घोषणांनी कुटुंब नियोजनाचा विचार लोकांच्या मनात रुजत गेला. या कार्यात ग्रामीण भागातील शिक्षण आणि आरोग्य कर्मचारी यांनी कितीतरी काळ महत्त्वाचे कसोशीने योगदान दिले. कुटुंब छोटे असेल तर दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक त्रास होत नाही, घरातील मुलांचे शिक्षण, आरोग्य, खानपान, कपडेलत्ते, या सुविधा पुरेशा उपलब्ध झाल्या की, प्रगतीकडे वाटचाल होते. हा विचार समाजातील तळागाळातील लोकांना समजून सांगणे, कुटुंब कल्याण कार्यक्रमात त्यांचा सहभाग वाढवणे हे काम किती अवघड आणि जिकरीचे होते, हे ग्रामीण भागातील शिक्षक आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना जाऊन विचारले पाहिजे! हिंदू-मुस्लिम झगडे लावण्याची कारस्थानं करणारे या कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमात कुठे होते?

कुटुंब नियोजन कार्यक्रम दूरदृष्टीने आखलेला कार्यक्रम होता. या कार्यक्रमाची उपयुक्तता सिद्ध करणारे परिणामही दिसत आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमामुळे माता व बालमृत्यू दरात लक्षणीय घट, दोन मुलांमध्ये आवश्यक अंतर, सुधारित आरोग्य आणि महिलांचे सक्षमीकरण वगैरे प्रमुख सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत.या कार्यक्रमामुळे मर्यादित संसाधनांवरचा ताण कमी होऊन कुटुंबाचा आर्थिक दर्जा उंचावण्यास मदत होते, तसेच लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रित राहतो. योग्य अंतराने गर्भधारणा झाल्यामुळे माता आणि अर्भकांचा मृत्यू दर कमी होतो.गर्भावस्थेशी संबंधित जोखीम कमी होते.

कुटुंबातील सदस्यांना, विशेषतः मुलांना चांगले पोषण आणि आरोग्य सुविधा मिळतात. महिलांना शिक्षणासह नोकरीच्या संधी मिळतात आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढतो. लहान कुटुंबात उत्पन्नाची साधने योग्य वापरली गेल्याने आर्थिक स्थिती सुधारते. कुटुंबातील मुलांना चांगले शिक्षण देण्याची क्षमता वाढते. अनियोजित गर्भधारणा टळल्यामुळे लोकसंख्या वाढीचा वेग मंदावतो . लोकसंख्येचा नैसर्गिक संसाधनांवरील ताण कमी होतो. लहान कुटुंबाचे महत्त्व पटल्यामुळे समाज मानसिकतेत बदल होत आहे. थोडक्यात, कुटुंब नियोजन कार्यक्रम हा केवळ गर्भनिरोधकांचा वापर नसून ते एक उत्तम जीवनमान, आरोग्य आणि उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक पाऊल आहे.

लोकांचे जीवनमान उंचावे या उदात्त हेतूने लोकांनी कुटुंब नियोजन कार्यक्रम स्वीकारल्यानंतर लोकजीवनात झालेले बदल स्पष्ट दिसून येऊ लागले असताना अधूनमधून "हिंदूंनी लोकसंख्या वाढवा," "तीन - चार - दहा लेकरं जन्माला घाला, " असे सांगणारे महाभाग लोकांना अधोगतीला नेऊ पहातात का?

विशेषतः मुस्लिमांची संख्या वाढली आणि हिंदूंची संख्या कमी झाली, अशी थातूरमातूर कारणं सांगत हिंदूमधील मागास स्त्रिया, ओबीसी, दलित, आदिवासी, भटके यांच्या विकासाच्या विरोधातील हा प्रचार आहे. यांची जातीनिहाय जनगणना करून मागासपण दूर करण्यासाठी होत असलेल्या मागणीला विरोध करणार. यांच्या तरुण मुलामुलींना रोजगार नाही त्याबद्दल हे कधी बोलणार नाही. विद्यापीठ - कॉलेजच्या अनियंत्रित फी वाढीविरुद्ध चुप्पी. गाव-खेड्यात यांच्या शिक्षणाची सोय असलेल्या शाळा बंद होऊ घातल्या असतानाही मब्रमही काढत नाही. एवढेच नव्हे तर हा कष्टकरी हिंदू समाज अन्नधान्य पिकवतो त्याच्या शेतमालाला धड भाव मिळत नाही, शेतकरी मरणासन्न झाला आहे, तर ग्रामीण कष्टकरी मजूराच्या हातातून काम निसटत असताना विपन्नावस्थेत जीवनयापन करीत आहेत. हे समदे हिंदूच! यांची अक्षम्य परवड चालू आहे. तरी जास्त पोरं पैदा करा म्हणणारे हिंदूंमधील या कष्टकरी अठरापगड जातींच्या विकासाच्या बाबतीत गिळून बसतात. आणि मुस्लिम संख्या वाढत आहेत "हिंदू धर्म खरे मे है" अशा गरजा मारत असतात. मुस्लिमांची भिती दाखवून हिंदूंनी जास्त लेकरं जन्माला घातली की कौटुंबिक विवंचनेत अधिक काळ जाईल. हा समाज दुःख - दारिद्र्यात लोटला जाईल. आरोग्याच्या दृष्टीने पिछाडीवर जाईल. शिक्षण, चांगले जीवनमान यात मागे पडतील. हजारो वर्षापासून ज्या उच्चजातीय वर्चस्ववादी तत्वांनी जुलमी सत्ता टिकवून ठेवली, त्यांना तसे करणे सहज सोयीचे होईल. इतका कारस्थानी डाव जास्त लेकरं जन्माला घाला म्हणणाऱ्यांचा दिसून येईल. मुस्लिम द्वेषाचे डोस पाजले की, हिंदूमधील मागासजाती चक्रव्यूहात सापडतात. आणि आपल्याच हिताचे विरोधक बनतात. हे सूत्र ब्राम्हणी वर्चस्ववादी अवलंबत आलेले आहेत.

ज्याप्रमाणे ओबीसीच्या भल्यासाठी असलेल्या मंडल आयोगाला विरोध करण्यासाठी बाबरी मस्जिद - राममंदिर वाद कळीचा मुद्दा करण्यात आला. तद्वतच कुटुंब नियोजनाच्या यशाला सरळ विरोध, केला तर कारस्थान ध्यानात येईल म्हणून मुस्लिमांची भिती दाखवून वारंवार जास्त लेकरं पैदा करण्याच्या कंड्या पिकवल्या जातात. असं करणारे दुसरे तिसरे कुणी नसून स्त्रिशुद्रातिशुद्र, अर्थात स्त्रिया, ओबीसी, दलित आदिवासी, भटके या मागासलेल्या हिंदूंचे हितशत्रू ठरतात. हिंदू धर्मातील सर्वात मोठा लोकसमुदाय असलेल्या लोकांचे भले न पहणारे उच्चजातस्वार्थी, हिंदूधर्माचे कर्दनकाळ नव्हे का?

**अनुज हुलके**

# अधिसुचना होवून वर्ष लोटला; तिढा कायमच

## राज्यपालांच्या अधिसूचनेला केराची टोपली: प्रकरण नगर पंचायतीचे

**आमगाव :-** जेव्हापासून आमगाव ग्राम पंचायतीला नगर पंचायतीचा दर्जा देण्यात आला. तेव्हापासून सुरू झालेला नगरपंचायत व नगर परिषदेच्या वाद शमलेला नाही. काही महिन्यापूर्वी राज्य शासनाने पालिकेचा दर्जा काढून आमगावला पुन्हा नगरपंचायतचा दर्जा बहाल केला. विशेष म्हणजे राज्य निवडणूक आयोगाने दोन महिन्यापूर्वीच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेतल्या. मात्र त्यातही आमगावचा समावेश नव्हता. तर दुसरीकडे राज्यपालांच्या अनुमोदनानंतरही संबंधित अधिसूचना वर्षभरापासून निकाली काढण्यात आलेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




राज्य शासनाने १२ फेब्रुवारी २०१५ रोजी अधिसूचना काढून आमगाव येथे नगर पंचायत स्थापनेची प्रक्रिया सुरू केली होती. या अधिसूचनेविरोधात सौ. पद्माताई चुटे यांनी जनहित याचिका दाखल केली होती. त्यानंतर शासनाने २ ऑगस्ट २०१७ रोजी आमगाव नगरपरिषद स्थापनेची अधिसूचना प्रसिद्ध केली. मात्र या निर्णयालाही विरोध दर्शवत ६ सप्टेंबर २०१७ रोजी रिट याचिका नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली. दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने २८ मार्च २०२५ रोजी नगर पंचायत गठीत करण्यासंदर्भात प्राथमिक उद्घोषणा प्रसिद्ध केली होती.

या उद्घोषणेनुसार संबंधित नागरिकांना ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे आक्षेप नोंदविण्याची संधी देण्यात आली होती. मात्र या प्रक्रियेनंतर राज्यपालांकडून अधिसूचनेला अनुमोदन मिळूनही सलग एक वर्ष उलटून गेले तरी अंतिम निर्णय जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे आमगाव नगरपरिषद स्थापनेचा विषय पुन्हा एकदा प्रशासकीय दिरंगाईत अडकला आहे. आमगाव नगरपरिषद स्थापनेचा प्रश्न आता केवळ प्रशासकीय विषय राहिला नसून तो स्थानिक विकास, नागरी सुविधा आणि नागरिकांच्या हक्कांशी संबंधित असल्याने शासनाने तातडीने यावर स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### आठ गावे दशकापासून उपेक्षित

**नगर पालिकेचा दर्जा काढल्यानंतर जी आठ गावे पालिकेत समाविष्ट होती. त्या गावांना पुन्हा ग्राम पंचायतीचा दर्जा बहाल करण्यात आला. मात्र अद्यापही त्या आठ गावात महसूल अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी नसल्याने त्या गावात पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, रस्ते विकास, कचरा व्यवस्थापन, नागरी आरोग्य सेवा तसेच विविध शासकीय नागरी विकास योजनांचा लाभ नागरिकांना मिळत नाही. अनेक विकासकामे प्रस्तावित असूनही प्रशासनिक दर्जा निश्चित न झाल्यामुळे ती कामे कागदावरच अडकून पडल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.**

# शासन धोरणामुळे १० हजार कुटुंबांवर बेरोजगारीचे संकट

## सूर्यघर योजनेत बदल : अटी शिथिल करण्याची ऑल इंडिया रिन्यूएबल असोसिएशनची मागणी



**गोंदिया :-** वाढती विजेची मागणी लक्षात घेत केंद्र सरकारकडून सोलरच्या माध्यमातून होणाऱ्या वीज निमितीला चालना दिली जात आहे. त्यातच प्रधानमंत्री सूर्यघर योजना सुरू करण्यात आली. मात्र, या योजनेत राज्य शासनाकडून नवीन धोरणात्मक बदला करण्यात आल्याने ही योजना वांद्यात आली आहे. परिणामी वेंडरला काम करणे कठीण जात असून, जिल्ह्यात वेंडरसह १० हजार कुटुंबांवर बेरोजगारीचे संकट ओढावले आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच योजना सुरू ठेवण्याची मागणी ऑल इंडिया रिन्यूएबल असोसिएशनने केली आहे.

राज्य शासनाच्या नव्या धोरणामुळे ग्राहकांना आवश्यक क्षमतेनुसार प्रकल्प बसविता येत नाही. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीला फटका बसत आहे. सोलर ऊर्जेचे उत्पादन ग्राहकांच्या भविष्यातील वाढत्या गरजांशी निगडीत असते. सोलर बसविल्यावर वीज वापर वाढणे हे नैसर्गिक असल्याने वीज क्षमतेतही वाढ होते. मात्र, राज्य शासनाकडून कोणतेही पूर्वसूचना किंबहुना सार्वजनिक माहिती न देता थेट पोर्टलवर लागू करण्यात आला आहे. हे सोलर विक्रेते, उद्योजक व ग्राहकांसाठी नवे धोरण मागे घेण्यात यावे, अन्यथा राज्यव्यापी तीव्र आंदोलन करू, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

सूर्यघर योजनेंतर्गत भविष्यातील गरजांनुसार सोलर क्षमतेसाठी मंजुरी मिळत होती. मात्र, नव्या नियमानुसार ग्राहकांच्या मागील १२ महिन्यांच्या वीज वापरावर आधारित सोलर क्षमतेची मर्यादा ठेवण्यात आली आहे.

पोर्टलवर त्यानुरूप ग्राहकांना वीज क्षमता निर्धारित केली जाते. यामुळे घरगुती, संस्था आणि औद्योगिक ग्राहकांना आवश्यक क्षमतेनुरूप सोलर प्रकल्प बसविता येत नाही. किंबहुना मंजुरी मिळत नाही. नव्या धोरणाचा या योजनेला फटका बसत आहे.

### व्हेंडरचे कामबंद आंदोलन

**एकंदरीत नव्या धोरणामुळे सूर्यघर मोफत वीज योजनेच्या उद्दिष्टाला राज्य शासनाकडून हरताळ फासले जात असल्याची प्रतिक्रिया ग्राहकांसह या व्यवसायात सहभागी असलेल्यांकडून उमटू लागली आहे. यामुळे १३ फेब्रुवारीपासून जिल्ह्यात योजनेंतर्गत कार्यरत व्हेंडरनी कामबंद आंदोलन केले आहे. परिणामी जिल्ह्यातील जवळपास २०० व्हेंडर व त्यांच्या माध्यमातून जवळपास १० हजार कुटुंबांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. त्यामुळे नवे धोरण मागे घेतल्याशिवाय या योजनेच्या अंमलबजावणीला वेग येणार नाही, अशी प्रतिक्रियाही उमटू लागली आहे.**

### ग्राहकांना अवाढव्य बिल

**सूर्यघर योजनेच्या माध्यमातून ग्राहकांना वीज बिलात दिलासा मिळेल, अशी ग्वाही केंद्र शासनाकडून देण्यात आली होती. त्यानुरूप सूर्यघर योजनेच्या अंमलबजावणीला वेग आला. मात्र आता सूर्यघर योजनेच्या ग्राहकांना महावितरणकडून अवाढव्य बिल येवू लागले आहे. त्यामुळे योजनेच्या माध्यमातून फसवणूक केल्याची भावना निर्माण होत आहे. वाढीव बिलांची दुरुस्तीसाठी ग्राहक महावितरणकडे जातात, तेव्हा संबंधित प्रकरण वरिष्ठ कार्यालयाला पाठविण्यात येईल, असे सांगितले जाते.**

# खरेदीचे उद्दिष्ट वाढवून खरेदी केलेल्या धानाचे चुकारे त्वरित द्या

**गोंदिया :-** जिल्ह्यात धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून खरेदी करण्यात आलेल्या धानाचे चुकारे द्या यासह अन्य मागण्यांसाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि.९) जिल्हा मार्केटिंग कार्यालयावर धडक दिली. यावेळी जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने निवेदन देण्यात आले.



जिल्ह्यात खरीप हंगामात धानाचे उत्पन्न जवळपास ८२ टक्के झाले असून, शेतकऱ्यांनी धान विक्रीकरिता प्रत्येक धान खरेदी केंद्रावर ऑनलाइन नोंदणी करून धान पाठविले आहे. परंतु, नोंदणी केल्याप्रमाणे धान खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण न दिल्यामुळे शेतकऱ्यांचा धान खरेदी करण्यात आला नाही. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असून, वारंवार धरणे, आंदोलने करण्यात आले आहे. धान खरेदीसंदर्भात वारंवार शासनस्तरावर पाठपुरावा करूनही त्यावर निर्णय घेण्यात आला नाही. अशात धान खरेदीचे उद्दिष्ट वाढविणे तसेच खरेदी केलेल्या धानाचे चुकारे देण्यात यावे यासह अन्य मागण्यांसाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि.९) जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांना निवेदन दिले. शिष्टमंडळात काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, उपाध्यक्ष अशोक चौधरी, अमर वऱ्हाडे, आनंद लांजेवार, शैलेश जायस्वाल, शिव नागधरे, रोशन बडोले, मधुसूदन दोनोडे, जितेंद्र रहकवार, जितेश राणे, हितेंद्र मेंढे, रमेश टेंभरे, राधेलाल पटले, दामोदर नेवारे, सिद्धार्थ गणवीर, नामदेव नाईक, पूनमप्रसाद लिल्हारे, दुलीचंद बिसेन, रूपेश खोब्रागडे, तारेश्वर चौधरी, रेवाशंकर पटले, राजू काळबांधे, देवचंद बिसेन, विजय फुंडे, राजू दोनोडे, संजय बहेकार, डेमेन्द्र रहांगडाले, अजय हनवती, रवी चुटे, कृष्णकुमार भावे, डॉ. हानिसिंह बघेले, गंगाधर परशरामकर, पी. जी. कटरे यांचा समावेश होता.

# गोंदिया येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन ११ मार्चला

**गोंदिया :-** जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया यांच्या वतीने दि.११ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया येथे रोजगार मेळव्याचे आयोजन करण्यात आले आहे.



या रोजगार मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे उद्योजक, नियोक्ता, प्लेसमेंट एजन्सी सहभागी होणार आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे.

इयत्ता १० वी व १२ वी पास, आयटीआय, तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर अशा पात्रता असणाऱ्या बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगाराची सुवर्ण संधी आहे. उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया या कार्यालयाचे नोंदणी कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथील दुरध्वनी क्रमांक ०७१८२-२९९१५० यावर किंवा gondiyarojgar@gmail.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा. या रोजगार मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त उमेदवारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन रा.ना.माटे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया यांनी केले आहे.

# फुटाळा येथे आमदार राजकुमार बडोलेनी घेतली सांत्वना भेट



**सडक अर्जुनी:-** फुटाळा येथे तलावात बुडून सागर आनिक गहाणे व प्रणय गोवर्धन गहाणे या दोन युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार राजकुमार बडोले यांनी फुटाळा येथे जाऊन त्यांच्या कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केले. या अत्यंत दुःखद प्रसंगी त्यांनी कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला.

यावेळी आमदार बडोले यांनी दिवंगत आत्म्यांना श्रद्धांजली अर्पण करत कुटुंबियांच्या पाठीशी शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत उभी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे सांगीतले. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबतही संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मतदारसंघातील आरोग्य सुविधांचा सखोल आढावा घेण्यासाठी मंगळवारी मुंबई येथील मंत्रालयात आरोग्य विभागाची बैठक आयोजित करण्यात आल्याची माहितीही आमदार बडोले यांनी दिली. नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील तसेच या संदर्भातील प्रश्न अधिवेशनातही उपस्थित करून शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, पंचायत समिती सभापती चेतन वडगाये, जि.प. सदस्य कविता रंगारी, कृ.उ.बा.स. सभापती अविनाश काशिवार, उपविभागीय अधिकारी ज्योती कांबळे, तहसीलदार प्रेरणा कटरे, पं.स. सदस्य वर्षा शहारे, फुटाळा सरपंच लता गहाणे, दीपक गहाणे, सचिन गहाणे, आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोदलकसा पर्यटनचा होणार विकास-जि.प. सदस्य व सरपंच यांच्यात चर्चा

**तिरोडा :-** बोदलकसा गावाच्या विकासाला आता नवी गती मिळणार आहे. गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि प्रलंबित समस्यांच्या निवारणासाठी या क्षेत्राचे कार्यक्रम जिल्हा परिषद सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तिरोडा तालुकाध्यक्ष जगदीश (बालू) बावनथडे यांनी पुढाकार घेतला असून, त्यांनी सरपंच चैतलाल पटले यांच्याशी चर्चा केली.



जिल्हा परिषद सदस्य जगदीश बावनथडे यांनी सरपंच चैतलाल पटले यांच्याशी केलेल्या चर्चेतून बोदलकसाच्या विकासाचे नवे पर्व सुरू होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. चर्चेतील मुख्य मुद्दे गावाची प्रगती आणि पर्यटन क्षेत्रातील विकासावर विशेष भर देण्यात आला. गावामध्ये पर्यटनाच्या संधी वाढवण्यासाठी आणि गावातील विविध प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी चैतलालजी पाटले यांनी जगदीशजी बावनथडे यांच्याकडे विशेष मागणी केली. यावर सकारात्मक प्रतिसाद देत कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे जिल्हा परिषद सदस्य जगदीश (बालू) बावनथडे यांनी आश्वासन दिले आहे.

# महिला लोकशाही दिन १६ मार्चला

**गोंदिया :-** जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी व अडीअडचणी ऐकून घेण्यासाठी दि.१६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# अनेकविध कला-क्रीडा उपक्रमांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना मिळते आत्मविश्वासाची उभारी



**गोंदिया :-** दिव्यांग विद्यार्थी कोणत्याही बाबतीत कमी नाहीत. त्यांच्या अंगी अपार क्षमता, जिद्द आणि चिकाटी दडलेली असते. योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास हे विद्यार्थी समाजात नवे आदर्श निर्माण करू शकतात. दिव्यांगत्व ही अडचण नसून ती त्यांच्या जीवनातील एक वेगळी परिस्थिती आहे; मात्र त्यावर मात करून यशस्वी होण्याची ताकद या विद्यार्थ्यांमध्ये आहे. त्यात अशा कला-क्रीडा उपक्रमांमुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो असे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित ग्राम कुडवा येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत शुक्रवारी (दि.६) आयोजित जिल्हास्तरीय दिव्यांग कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमाला जि.प. उपाध्यक्ष सुरेश हर्ष, सभापती लक्ष्मण भगत, सभापती दीपा चंद्रिकापूरे, पं. स. सभापती

मुनेश रहांगडाले, चेतन वडगाये, जि.प. सदस्य पूजा शेठ, छबू उके, पं. स. सदस्य राहुल मेश्राम, सरपंच बाळकृष्ण पटले, रोहित अग्रवाल,शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विशाल डोंगरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कमलनाथ फरदे, उपाध्यक्ष सुमेध जगणित, गटशिक्षणाधिकारी एम. एल. मेश्राम, अहमद मनिहार, विस्तार अधिकारी नंदकुमार उहाके, केंद्रप्रमुख बी. डी. डोंगरे, मंजुलता वैष्णव यांच्यासह इतर मान्यवर, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# येरंडी आदिवासी आश्रम शाळेतील ११ वर्षीय विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू

**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील येरंडी येथील आदिवासी आश्रम शाळेत इयत्ता पाचवीत शिक्षण घेत असलेली ११ वर्षीय विद्यार्थिनी नुतन निताराम मडावी हिचा अल्पशा आजाराने दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे.या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, होळीच्या सुट्टीनिमित्त शाळा व्यवस्थापनाने २६ फेब्रुवारी रोजी नुतन हिला तिच्या लहान बहिणीसह मूळ गाव परसटोला येथे सुखरूप पोहोचविले होते. त्यानंतर दोन दिवसांनी ती आपल्या मामाच्या गावात जुनेवाणी येथे गेल्याची माहिती आहे. मात्र तेथे अचानक तिची प्रकृती बिघडली. कुटुंबीयांनी तिला प्रथम कुरखेडा येथील रुग्णालयात नेले व नंतर पुढील उपचारासाठी गडचिरोली येथे हलविले. मात्र उपचारादरम्यान ३ मार्च रोजी तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर विद्यार्थिनीला शाळेत असताना काही प्रकृतीसंबंधी तक्रार होती का, तिला वेळेवर वैद्यकीय उपचार मिळाले होते का तसेच या संपूर्ण प्रकरणात प्रशासनाची भूमिका काय होती, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.



दरम्यान, येरंडी येथील आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका नूतन अनिल दहिवले यांनी सांगितले की, विद्यार्थिनीला होळीच्या सणानिमित्त २६ फेब्रुवारी रोजी तिच्या गावी सुखरूप सोडण्यात आले होते. शाळेच्या नोंदी तपासल्या असता ती शाळेत असताना आजारी असल्याची कोणतीही नोंद नाही. ती पूर्णपणे ठणठणीत असल्यानेच तिला गावी पाठविण्यात आले होते. तिच्या मृत्यूची माहिती मिळताच आपण स्वतः कुटुंबीयांना भेटून सांत्वन केले असून शाळेच्या वतीने शक्य ती मदत करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच शाळेत विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी केली जात असल्याचा दावा त्यांनी केला. नुतनच्या अकाली निधनामुळे गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून या घटनेची सत्य परिस्थिती समोर यावी व आवश्यक ती कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ग्रामपंचायत खैरबोडी येथील सरपंचाने घरकुलाचा व विविध योजनांच्या लाभ घेऊन निधीची अपरातफर केल्याच्या आरोप

## उपसरपंचासह पाच ग्रामपंचायत सदस्यांनी केली वरिष्ठांना तक्रार



**तिरोडा:-** खैरबोडी येथील ग्रामपंचायत सरपंच यांनी घरकुलाच्या व अन्य योजनांच्या लाभ घेऊन निधीची अपरातफर केल्याच्या आरोप खैरबोडी येथील उपसरपंच व पाच सदस्यांनी केला यात सरपंचावर खालील प्रकारे आरोप करण्यात आले.

मासिक सभेमध्ये जमाखर्च न सांगणे , साहित्याची टेंडर काढलेले नाही ,साहित्य आपल्याच मताने विकत आणतात, सरपंच आणि आपल्या पदाचा दुरुपयोग करून १५००० रुपयाची रक्कम आपली पती विनोद टेंभरे यांच्या खात्यात जमा केली. घरकुलाच्या लाभ घेतला असून त्यांचे पती हे इन्कम टॅक्स रिटर्न भरणारे असून कृषी उत्पन्न बाजार समिती येथे दलाल व परवानाधारक व्यापारी असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे तसेच पतीच्या नावाने गुरांच्या गोठा चा लाभ घेतला आहे. सार्वजनिक शौचालय दुरुस्ती एक लाख वीस हजार रुपये काम केलेला दिसून येत नाही निधी मात्र काढण्यात आलेला आहे. व्यायाम शाळेतील साहित्य खरेदी २०२५ मध्ये तीस हजार रुपये निधीच्या गैरवापर झाला आहे. वाचनालयात पुस्तका व फर्निचर खरेदी न करता ५० हजार रुपये निधी काढून गैरवापर केला आहे. जिल्हा परिषद शाळेतील शौचालय दुरुस्तीवर ६० हजार रुपये निधीच्या गैरवापर करण्यात आला आहे. अशाप्रकारे २०२२ -२३, २०२३ -२४, २०२४- २५ या काळात भरपूर निधी काढून निधीची अपरधपर केल्याच्या आरोप उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्यांनी केलेला असून याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी गोंदिया, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया ,गटविकास अधिकारी पंचायत समिती तिरोडा यांना दिल्ली असून तक्रारीत कारवाईची मागणी करण्यात आलेली आहे .

अशा या पदाचा दुरुपयोग करणाऱ्या सरपंच विद्या विनोद टेंभरे यांना चौकशी करून पदरिक्त करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

ही मागणी ग्रामपंचायत खैरबोडी येथील उपसरपंच महेश दुलीचंद ठाकरे, ग्रामपंचायत सदस्या दीक्षा सुनील नागदेवे, शकुंतला लक्ष्मण मरस्कोल्हे, भूमिता कैलास टेंभरे, अनिता रमेश टेंभरे, आकाश जगदीश परतेती यांनी केली आहे.

याबाबतीत सखोल चौकशी पंचायत समिती तिरोड्याचे वतीने होणार काय ? पंचायत समितीचे खंडविकास अधिकारी याकडे लक्ष देणार आहेत काय ? लक्ष देऊन सबंधित सरपंचांना पायउतार करणार आहेत का? या बाबीकडे खैरबोडीवासी यांचे तसेच परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.


# ग्रामपंचायत कार्यालय परसटोला

## पंचायत समिती अर्जुनी/मोर,जिल्हा परिषद गोंदिया

### निविदा सुचना

दि.१०/०३/२०२६

ग्रामपंचायत कार्यालय परसटोला पंचायत समिती अर्जुनी/मोर, जिल्हा परिषद गोंदिया येथे १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत खालील विवरणप्रमाणे बांधकाम करण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय परसटोलाकडे यथायोग्य श्रेणीत नोदंणीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून लिफापा पद्धतीने कामे करण्याकरिता ऑफलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | नियोजन वर्ष | सांकेतांक क्रंमाक | अंदाजपत्रक किंमत | निविदा फार्म किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत विस्तारीकरण व आवारात मंच तयार करणे | २०२४-२०२५ | ९६४०१४६५ | २०००००/- | ५००/- | २०००/- |
| २ | परसटोला बसस्टाप बिल्डींगची आवश्यक दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | २०२५-२०२६ | ११३३७०७०१ | ३०००००/- | ५००/- | ३०००/- |
| ३ | ग्रा.पं.हद्दीतील सर्व अंगणवाडी इमारतींची आवश्यक दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | २०२५-२०२६ | ११३३६९६४७ | ३५००००/- | ५००/- | ३५००/- |

**१) वरील कामाची कोरी निविदा फॉर्म दि.:-११/०३/२०२६ ला १२.०० वाजेपासुन ते दिनांक:-१९/०३/२०२६ ला सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधी पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय परसटोला येथे निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म खरेदी केल्यानंतर त्याची पावती मिळेल.**

**२) सदर कामाची निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक:-११/०३/२०२६ ते दिनांक १९/०३/२०२६ ला सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून (ग्रामपंचायत कार्यालय परसटोला येथे अमानत रक्कम भरल्याची पावती मिळेल)**

**३) मोहरबंद निविदा माहे मार्च २०२६ ला होणाऱ्या मासिक सभेत उघडण्यात येईल याची विशेष नोंद घ्यावी.**

**४) सदर कामाची तपशिलदार संपुर्ण माहिती अटी व शर्थीसह ग्रामपंचायत कार्यालय परसटोला येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली आहे.**

**स्थळ:- ग्रा.पं.परसटोला** — **प्रशासक, ग्रामपंचायत कार्यालय परसटोला** — **ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय परसटोला**

**दिनांक:- १०/०३/२०२६**

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत नागरिकांना तत्परतेने सेवा प्रदान : लायकराम भेंडारकर

**गोंदिया :–** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत नागरिकांना तत्परतेने सेवा पोहचविण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी समन्वयाने काम करण्याची भूमिका असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील महागाव मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचा पहिल्या टप्प्यातील प्रथम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी श्री. भेंडारकर बोलत होते. या समाधान शिबिरात जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती पौर्णिमा ढेंगे, जि.प. सदस्य जयश्री देशमुख, पंचायत समिती सदस्य नाजुक कुंभरे, जिल्हाधिकारी प्रजित नायर, उपविभागीय अधिकारी ज्योती कांबळे, तहसिलदार अनिरुध्द कांबळे, प्रशासक महागाव ग्रामपंचायत प्रभाकर कोवे व अन्य अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

श्री. भेंडारकर पुढे म्हणाले, शासनाचे निर्णय, धोरण, योजना अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी अशाप्रकारच्या शिबिरांची अत्यंत गरज आहे. गावातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहचावा हा या मागचा हेतू आहे.

जिल्हाधिकारी श्री. नायर यांनी प्रशासन दुर्गम भागातील शेवटच्या नागरिकापर्यंत पोहचून अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे सांगितले. कामकाजात त्रुटी, अडचणी असल्यास त्यावर सकारात्मकतेने मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.

गोंदिया तालुक्यातील गोंदिया मंडळात जलाराम लॉन गोंदिया या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार विनोद अग्रवाल, पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले,



उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, तहसिलदार समशेर पठाण, अपर तहसिलदार श्रीकांत कांबळे उपस्थित होते. यावेळी लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

तिरोडा तालुक्यातील परसवाडा मंडळात जिल्हा परिषद हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय परसवाडा येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी पुजा गायकवाड, तहसिलदार नारायण ठाकरे व लोकप्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले.

गोरेगाव तालुक्यातील हिरडामाली मंडळात गुरुकृपा लॉन येथे निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, परिविक्षाधीन अधिकारी साईकिरण नंदाला, माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे यांच्या प्रमुख उपस्थितीत लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

देवरी तालुक्यातील ककोडी मंडळात ग्रामपंचायत कार्यालय मुरमाडी येथे आमदार संजय पुराम, उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, अपर तहसिलदार चिचगड नवनाथ कातकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले.

आमगाव तालुक्यातील तिगाव मंडळात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जांभुरटोला येथे नायब तहसिलदार श्री. वेलादी यांच्या उपस्थितीत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

सालेकसा तालुक्यातील आमगाव खुर्द मंडळात ग्राम पंचायत कार्यालय तिरखेडी येथे तहसिलदार नरसय्या कोंडागुर्ले यांच्या प्रमुख उपस्थितीत पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

सडक अर्जुनी तालुक्यातील शेंडा मंडळात जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा शेंडा येथे तहसिलदार प्रेरणा कटरे यांच्या प्रमुख उपस्थितीत लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

# युपीएससीच्या परिक्षेत गोंदियाचा श्रवण व आदिवासी गाव चिचेवाड्याचा हेमकृष्ण उत्तीर्ण

**गोंदिया:–** संघ लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी ) परीक्षेत गोंदिया जिल्ह्यातील दोन युवकांनी उल्लेखनीय यश संपादन करत जिल्ह्याचा नावलौकिक देशपातळीवर उजळिवला आहे.गोंदिया शहरातील श्रवण ब्रजरतन मूंदडा ने २७५ वी रँक मिळवली असून देवरी तालुक्यातील चिचेवाडा येथील शेतकरी कुटुंबातील सुपुत्र हेमकृष्ण प्रेमलाल पिसदे याने ८३९ वी रँक मिळवत यश संपादन केले आहे.हे शहर आणि ग्रामीण भागातून घडलेली ही दुहेरी कामगिरी जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. गोंदिया शहरातील श्रवण मूंदडाचे प्राथमिक शिक्षण गोंदिया शहरातच झाले.त्याने दिल्ली विद्यापीठातील हिंदू कॉलेजमधून बी.कॉम पदवी प्राप्त केली.आयआयएम कोलकाता येथून एमबीए पूर्ण करत आपल्या शैक्षणि क प्रवासाला अधिक बळ दिले. उच्च शिक्षणानंतरही देशसेवेचे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवत त्याने यूपीएससीची तयारी सुरू केली आणि या कठीण परीक्षेत २७५ वी रँक मिळवत उल्लेखनी यश



संपादन केले.

२०२५ बॅचच्या संघ लोक सेवा आयोगाच्या परिक्षेच्या निकालामध्ये देवरी तालुक्यातील अतिदुर्गम भागातील चिचेवाडा गावातील हेमकृष्ण प्रेमलाल पिसदे या आदिवासी युवकाने मानाचा झेंडा रोवला. परिणामी, हेमकृष्ण यांचे देवरी तालुक्यासह राज्यातूनही कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हेमकृष्ण याचा जन्म देवरी तालुक्यातील चिचेवाडा या अतिदुर्गम आदिवासी गावात झाला. त्याचे प्राथमिक शिक्षण हे गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण हे देवरी येथील मनोहरभाई पटेल कनिष्ठ महाविद्यालयातून झाले. त्याने बीएची पदवी पुण्याच्या फर्ग्यूसन कॉलेज मधून संपादन केली तर एमएची पदवी सावित्रीबाई फुले महाविद्यालातून पूर्ण केली.

हेमकृष्ण याने चारवेळा महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केल्या असल्यातरी त्याचा डोळा युपीएसी परीक्षेवर होता. यामुळे चार वेळा एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण केली असली तरी त्याला यामध्ये रस नव्हता. मुलगा एक ही नोकरी पत्करीत नसल्याचे पाहून वडील प्रेमलाल पिसदे यांनी त्याला नोकरी पत्करण्याची सल्ला दिला. म्हणून त्यानी मुंबई येथे पहिल्यांदा कामगार अधिकारी म्हणून नोकरीला सुरवात केली. पण त्यावर संतुष्ट न होता तो स्पर्धा परीक्षा देत राहिला. २०२५ मध्ये त्याची तहसीलदार पदी निवड झाल्याने अमरावती जिल्हातील धामनगाव येथे नायब तहसीलदार म्हणून नियुक्ती झाली. सध्या हेमकृष्ण हा तेथे कार्यरत असताना काल युपीएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यामध्ये हेमकृष्ण याने संपूर्ण देशातून ८३९ रँक मिळवून यश संपादन केले आहे.

# नरेगा कामांवर शासनाचा ब्रेक, जलजीवन मिशनही झाली फेल! सरपंच संघटनेने व्यक्त केला संताप!



**गोंदिया:–** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांवर शासनाने अघोषित बंदी घातल्याने शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरी, गोठे, फळबागांसह सार्वजनिक कामे रखडली असून ग्रामीण विकास ठप्प झाला आहे. परिणामी जिल्ह्यातील शेकडो सरपंचांनी जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी कार्यालय गाठून संताप व्यक्त करीत ही कामे तत्काळ सुरू करा अन्यथा शेतकऱ्यांना घेवून तीव्र आंदोलन करू असा गंभीर इशारा शासन प्रशासनाला दिला आहे.

हर घर जल, हर घर नल या घोषणेसह मागील तीन ते चार वर्षांपासून जल जीवन मिशनची केवळ मार्केटिंग केली जात असून एकही गावात या योजनेचे पाणी घरापर्यंत पोहचू शकले नाही. जिल्ह्यात जवळपास ४०० पेक्षा अधिक योजना अर्धवट ठप्प आहेत. उलट या योजनेच्या कामासाठी चांगले रस्ते उखडून ते तसेच ठेवण्यात आल्याने गावागावात एकीकडे पाण्यासाठी तर दुसरीकडे रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी हाहाकार माजला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत करण्यात आलेल्या सार्वजनिक कामांसह शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरी, गोठे, फळबागा आणि इतर कामांची देयके न दिल्याने शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे देयके प्रलंबित असल्याने नवीन विहिरी, गोठ्याच्या कामांना मंजुरी देण्यावर बंदी घातल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. योजनांचा केवळ गाजावाजा करून ग्रामपंचायती आणि शेतकरी शेतमजुरांना वेठीस धरण्याचे काम शासन करत असल्याचा आरोप सरपंच संघटनेने लावला आहे. विशेष म्हणजे ग्रामीण नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या मुख्य उद्देशाने रोजगार हमी योजना क्रियान्वित करण्यात आली मात्र सध्या नवीन कामांना मंजुरी देणे बंद असल्याने मजुरांना गावात काम मिळत नसल्याने त्यांचे शहराकडे पलायन वाढले आहे. यासह ग्रामीण विकासाच्या अनेक कामांवर शासनाने ब्रेक लावला असल्याने सरपंचांनी नाराजी व्यक्त करीत आंदोलनाचा इशारा दिला आहे. या संदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले आहे. यावेळी सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकुमार बहेकार, मार्गदर्शक गंगाधर परशुरामकर, उपाध्यक्ष मनीषसिंह गहेरवार, महिला जिल्हाध्यक्ष वर्षा पटले, आमगाव तालुकाध्यक्ष मुकेश शिवणकर, अर्जुनी मोरगाव तालुका सचिव लक्ष्मीकांत नाकाडे, सरपंच भीमेश्वरी रहांगडाले, सरपंच सुरेंद्र परतेती, देवरी तालुकाध्यक्ष मनोहर राऊत यांचेसह जिल्ह्यातील सरपंच उपसरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बाजपेयीवर रामनगर पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल

**गोंदिया:** – येथील डॉ. नितेश बाजपेयी याने गोंदियात जन्मलेल्या एका बाळाची भंडारा जिल्ह्यात विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला. या प्रकरणात डॉ. बाजपेयीसह पाच आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

यात एक महिला आरोपीचाही समावेश आहे. तपासादरम्यान पुन्हा एका अल्पवयीन मुलीची प्रसूती गोंदियात करून तिचेही बाळ डॉ. बाजपेयी याने विक्री केल्याचे भंडारा पोलिसांनी उघड केले आहे. या प्रकरणी डॉ. बाजपेयी याच्यावर रामनगर पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये शुक्रवारी (दि. ६) रात्री गुन्हा दाखल करण्यात आला.

येथील डॉ. बाजपेयी याने पहिले नवजात बाळ भंडारा जिल्ह्यातील पांढराबोडी गावातील एका महिलेला अडीच लाख रुपयांत विकले होते. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी डॉक्टरसह सहा आरोपींना अटक केली. तपासादरम्यान डिसेंबर महिन्यात आणखी एका नवजात बाळाची विक्री केल्याचे पोलिस तपासात पुढे आले. पोलिसांनी त्या बाळालादेखील ताब्यात घेतले असून तपासात हे बाळ एका अल्पवयीन मुलीचे असल्याचे निष्पन्न झाले. शेजारच्या मध्यप्रदेश राज्यातील लांजी येथील अल्पवयीन मुलगी येथील डॉ. बाजपेयी याच्या बालाजी हॉस्पिटलमध्ये प्रसूतीसाठी गेली होती. या प्रकरणात डॉ. बाजपेयी यांनी प्रसूती करून हे बाळ भंडारा जिल्ह्यातील मोहगाव येथे चार लाख रुपयांत विकल्याचे समोर आले. मुलगी अल्पवयीन असतानाही प्रसूतीपूर्वी पोलिसांना कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती. त्यामुळे भंडारा पोलिसांनी रामनगर पोलिस ठाण्यात डॉ. बाजपेयी याच्यावर पोस्को कायद्यांतर्गत



शून्य गुन्ह्याची नोंद करून प्रकरण रामनगर पोलिसांकडे पाठविले.

**प्रियकराला केली अटक**

हे प्रकरण १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या दरम्यान असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. या प्रकरणात डॉ. बाजपेयी व अल्पवयीन मुलीचा प्रियकर मुकेश मन्सुरे (२२, रा. लांजी) या दोघांवर फिर्यादी सहायक पोलिस निरीक्षक प्रतिभा राऊत यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ६४, (२) (अ), ३, ५, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम कलम ४, ६ अन्वये ६ मार्च रोजी गुन्हा दाखल केला आहे. प्रियकर मन्सुरे याला अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून, तपास सहायक पोलिस निरीक्षक नागरगोचे करीत आहेत.

**प्रसूतीदरम्यान हजर सर्वच डॉक्टर येणार गोत्यात**

अल्पवयीन मुलीचे बाळ विक्रीप्रकरणी डॉ. बाजपेयी याने आपल्या मालकीच्या येथील खासगी रुग्णालयात तिची प्रसूती केली. ही प्रसूती करणारे डॉक्टर शहरातील बाई गंगाबाई शासकीय रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने सेवा देणारे असल्याची माहिती आहे. प्रसूतीच्या वेळी बालरोगतज्ज्ञ डॉक्टर, प्रसूती करणारे डॉक्टर व सोनोग्राफी करून घेणारे रेडिओलॉजिस्ट डॉक्टर कोण होते, हेदेखील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर लवकरच उघड होईल.

# कन्हारटोला येथे रस्ता बांधकामाचे भूमिपूजन



**गोरेगाव:–** तालुक्यातील पिंडकेपार अंतर्गत येत असलेल्या कान्हारटोला येथे रेल्वे स्टेशन रोडच्या बांधकामाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे बांधकाम व अर्थ सभापती डॉ.लक्ष्मण भगत यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या रस्त्याच्या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून वाहतुकीची सोय अधिक सुलभ होणार आहे. क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, नाल्या व इतर मूलभूत सुविधा निर्माण करणे हे आपले ध्येय असून परिसरात जास्तीत जास्त विकास कामे कशी करता येतील यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

याप्रसंगी पंचायत समिती सदस्या शितलताई बिसेन, माजी पं.स. सभापती सुरेंद्र बिसेन, ग्रा.पं. सदस्य नीलकंठ बिसेन, बाबा भाऊ बिसेन, हिरदिलाल बिसेन संजय गालपल्लीवार, शिवा बिसेन, लोकेश टेंभरे, काशीराम टेंभरे, राजेश देशमुख, आनंदराव रहांगडाले, खोमेंद्र बिसेन तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ४३० अंगणवाड्यात पाण्याचा अभाव

**गोंदिया :–** जिल्ह्यातील चिमुकल्यांच्या संगोपनाच्या दृष्टीने गाव, वस्ती, वाडा व टोला अशा ठिकाणी अंगणवाडी सुरू करण्यात आली आहे. मात्र, जिल्ह्यातील १८०५ अंगणवाड्यापैकी १६३९ अंगणवाडीला स्वतंत्र इमारत आहे. तर १६६ अंगणवाड्यात भाड्याची इमारत, खासगी इमारत, प्राथमिक शाळेची इमारत, समाजमंदिर, ग्रामपंचायत व इतर ठिकाणी आहेत. बसवून अध्यापनाचे धडे गिरवावे लागत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, जिल्ह्यातील ३८५ अंगणवाडी शौचालयाचा अभाव तर ४३० अंगणवाडीत पिण्याच्या पाण्याची असुविधा जाणवत आहे.

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत जिल्ह्यातील चिमुकल्यांचे शिक्षण व संगोपन योग्य प्रकारे व्हावे या उद्देशाने गाव, वस्ती, वाडा अशा विविध ठिकाणी जिल्ह्यात १८०५ अंगणवाडी केंद्र सुरू करण्यात आले आहे. अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून चिमुकल्यांचे संगोपन करण्यासाठी प्रत्येक अंगणवाडीसाठी एक अंगणवाडी शिक्षिका व एक मदतनीसांची नियुक्ती केली जाते. त्यांच्या माध्यमातून चिमुकल्यांचे शिक्षण व संगोपन कार्यात मदत होत असते. यासह भौतिक सुविधावर विशेष भर दिला जात असतो. असे असले तरी जिल्ह्यातील अंगणवाडी व मिनी अंगणवाडीमध्ये भौतिक सुविधांचा अभाव असून जिल्ह्यातील ३८५ अंगणवाडीत शौचालयाचा अभाव तर ४३० अंगणवाडीत पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याचे दिसून येत आहे. भौतिक सुविधेअभावी

चिमुकल्यांचे संगोपन रखडल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात १५६८ अंगणवाडी तर २३७ मिनी अंगणवाडी सुरू करण्यात आल्या आहेत. या अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून चिमुकल्यांचे पूर्व प्राथमिक शिक्षण व संगोपनाचे कार्य सुरु असते. मुख्यत्वे करून ३ वर्ष पूर्ण झाल्यानंतर ६ वर्षापर्यंतच्या चिमुकल्यांना ज्ञानाचे बालके याच अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून दिले जाते. बालवयात चिमुकल्यांवर चांगले संस्कार देखील अंगणवाडी केंद्रांच्याच माध्यमातून होत असते. चिमुकल्यांवर चांगले संस्कार व्हावेत या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागांतर्गत अंगणवाडीसाठी स्वतंत्र इमारत तयार करण्यात आल्या आहे. त्या बरोबरच अंगणवाडीत येणाऱ्या चिमुकल्यांना कसल्याही प्रकारचा त्रास होऊ नये. या उद्देशाने शौचालय असणे आवश्यक आहे. तसेच घरून अंगणवाडीत येणाऱ्या चिमुकल्यांना पिण्याचे पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येक अंगणवाडीत पिण्याच्या पाण्याची सुविधा आवश्यक आहे. मात्र नसल्यामुळे विद्यार्थ्यांना मनस्ताप होत आहे

# भोसनाळा तलाव दुरुस्तीसाठी निधी



**गोंदिया :–** एकोडी जिल्हा परिषद क्षेत्रातंर्गत येत असलेल्या भोसनाळा तलाव (जुनेवानी) लघू सिंचन तलावाच्या दुरुस्तीकरिता जिल्हा परिषद सदस्या अश्विनी रविकुमार पटले यांच्या विशेष प्रयत्नातून २५ लाख रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.

कामाचे भूमिपूजन शुक्रवारी करण्यात आले. भूमिपूजन प्रसंगी पंचायत समिती सदस्य वंदना पटले, गंगाझरी सरपंच सोनू घरडे, माजी सरपंच रविकुमार पटले, माजी पंचायत समिती सदस्य प्रकाश पटले, बबलू रहांगडाले, शाखा अभियंता मयंक माधवानी, आर.डी. राणे, जितेश सोलंकी, ओमकार मडावी, किशोर टेकाम, विनोद कोपरकर, विजय डोंगरे, योगेंद्र टेकाम, दीपक टेकाम, श्यामकुवर इनवाते, चंद्रसिंगजी टेकाम यांच्यासह जुनेवानी व गंगाझरी येथील बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते. या कामांतर्गत तलावाचे गेट दुरुस्ती, वेस्ट वेयर दुरुस्ती तसेच तलावाचे खोलीकरण करण्यात येणार आहे.

या कामामुळे वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होईल तसेच पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी तलावात साठून राहील. यामुळे जुनेवानी येथील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याचा उपयोग करता येणार आहे.

# लॉयड्स मेटल्सच्या क्रिकेट टिम, बिग भारत लीगमध्ये ठरली विजेता

**गडचिरोली :–** जिल्ह्यातील लॉयड्स मेटल्स अॅन्ड एनर्जी लि.च्या संघाने आंध्र प्रदेशातील प्रमुख कॉर्पोरेट क्रिकेट स्पर्धांपैकी एक असलेल्या बिग भारत लीग (BBL) सिझन–२ मध्ये शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. ही स्पर्धा १४ फेब्रुवारी ते ४ मार्चदरम्यान विशाखापटनम येथे आयोजित करण्यात आली होती. उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत लॉयड्सच्या क्रिकेट संघाने विजेतेपदाची ट्रॉफी आणि २,००,००० चे रोख पारितोषिक पटकावले.




या स्पर्धेत शासन, कॉर्पोरेट, वैद्यकीय आणि व्यावसायिक क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारे एकूण आठ संघ सहभागी झाले होते. यात लॉयड्स मेटल्स व्यतिरिक्त केंद्र सरकारचा बाईकर्स स्टुडिओ यूनियन हिटर्स, रेल्वे विभागाचा इलाईट रेल स्ट्राईकर्स, विनस्मिथ स्टेट डायनामाईट्स, आयुषमान व्हाईट कोट वॉरियर्स, फॉर्च्युन कॉर्पोरेट किंग्स यांच्यासह इतर अनेक प्रमुख संघांचा समावेश होता.

कर्णधार विजय कोडापे यांच्या नेतृत्वाखाली लॉयड्स मेटल्सच्या संघाने उत्कृष्ट संघभावना आणि सर्वांगीण खेळाच्या जोरावर नॉकआउट फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत झालेल्या चुरशीच्या सामन्यात लॉयड्स संघाने फॉर्च्युन कॉर्पोरेट किंग्स संघावर तीन विकेट्सने रोमांचक विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

ग्रँड फायनलमध्ये इकेन्ट्रिक पॉवर टायकॉन्स संघासोबत झालेल्या लढतीत लॉयड्स संघाने प्रथम फलंदाजी करत १७४ धावांचे लक्ष्य उभे केले. त्यानंतर शिस्तबद्ध गोलंदाजी आणि चपळ क्षेत्ररक्षणाच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाला ११६ धावांवर रोखले आणि ५८ धावांनी शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले.

अंतिम सामन्यात नंदकुमार यांनी महत्त्वाची भूमिका बजावत ४७ धावा केल्या आणि एक विकेट घेतली. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्यांना ङ्मॅन ऑफ द फायनलफ पुरस्कार देण्यात आला. उपदेश राजपूत यांना स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक म्हणून गौरविण्यात आले, तर कर्णधार विजय कोडापे यांना संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरीबद्दल ङ्मॅन ऑफ द सिरीजफ पुरस्कार मिळाला.

लॉयड्स मेटल्स अॅन्ड एनर्जी लि.चे व्यवस्थापकीय संचालक बी.प्रभाकरन यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करत कंपनीत कार्यरत इतर खेळाडूंनाही त्यांच्या आवडत्या खेळासाठी कंपनीकडून पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. हा विजय लॉयड्स मेटल्ससाठी अभिमानाचा क्षण असून स्थानिक युवा प्रतिभांना खेळात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रेरणा देणारा असल्याची भावना प्रभाकरन यांनी व्यक्त केली.

# महिला दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांकडून पथनाट्य

**गोरेगाव:**–स्थानिक पी डी राहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना (छडड) च्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त समाजामध्ये महिलांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी पथनाट्य सादर केले. हे पथनाट्य गोरेगाव शहरातील भंगाराम चौक, ठाणा चौक, बस स्टॉप या प्रमुख चौकात सादर करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी महिलांचे हक्क, शिक्षणाचे महत्त्व, स्त्रीभ्रूणहत्या, तसेच महिलांवरील अत्याचार यांसारख्या सामाजिक समस्यांवर प्रभावी अभिनय करून लोकांचे लक्ष वेधले. पथनाट्याद्वारे महिलांचा सन्मान राखणे आणि त्यांना समान संधी देणे हा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. समाजामध्ये महिलांविषयी सकारात्मक विचार निर्माण व्हावेत, हा या पथनाट्याचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाप्रसंगीमहाविद्यालयाचे प्राचार्य सी डी मोरघडे सर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगितले, पर्यवेक्षक ए. एच. कटरे सर तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा.डी.एम.राठोड, प्रा.सी. आर बिसेन, प्रा. डी.बी. चाटे, प्रा. ए.जे.सोरले, प्रा.जे.वाय. बिसेन, प्रा.के.आय. कटरे, कु. एस. आर. मांढरे, एस.आर. रहांगडाले, आय. बी. पटले, आर. वाय. कटरे, झेड.जे.भोयर, अभय रहांगडाले तसेच माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक– शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.



# गर्भाशय मुखाचा कॅन्सर रोखण्यासाठी लसीकरण आवश्यक- जिल्हाधिकारी प्रजित नायर

## कॅन्सरला दूर ठेवण्यासाठी होणार मुलींचे ‘एचपीव्ही’ लसीकरण

**गोंदिया :–** महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रतिबंधासाठी ‘एचपीव्ही’ (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण हे अत्यंत प्रभावी व सुरक्षीत उपाय आहे. १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींनी लसीकरण केल्यास, भविष्यात संसर्गाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होऊन मुलींचे आरोग्यविषयक भविष्य सुरक्षित राहू शकते. त्यामुळे गर्भाशय मुखाचा कॅन्सर रोखण्यासाठी लसीकरण करणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मएचपीव्हीफलसीकरण बाबत जिल्हास्तरीय टास्क फोर्स समितीची सभा आयोजित करण्यात आली होती, यावेळी श्री. नायर बोलत होते.

सभेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार



वाघमारे, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयाचे सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पवन राऊत, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.भारती जयस्वाल यांचेसह इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. नायर पुढे म्हणाले, “एचपीव्ही’ लसीकरण केल्यामुळे गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सरचा धोका टाळता येणार आहे. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागात मएचपीव्हीफ लसीकरणाविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी यावेळी आरोग्य विभागाला दिले.

लसीकरणाबाबत कुठलीही भीती न बाळगता पालकांनी यासाठी पुढाकार घ्यावा. यामुळे मुलींचे आरोग्यविषयक भविष्य सुरक्षित होऊ शकते. सर्व विभागांनी एकत्रित सहकार्याने मएचपीव्हीफ लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबवावी, असे त्यांनी यावेळी सांगितले.

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला दूर करण्यासाठी ज्या मुलींचे वय १४ वर्ष पुर्ण झाले आहे, परंतु १५ वर्ष पुर्ण होण्यास आहे म्हणजेच १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींचे मएचपीव्हीफ लसीकरण होणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी यावेळी दिली.या जिल्हास्तरीय मएचपीव्हीफ लसीकरण बाबतचे सादरीकरण जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.रोशन राऊत यांनी केले.